|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : १० सोमवार दि. १७ मार्च २०२५ ते रविवार दि. २३ मार्च २०२५ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## ‘जेवून घे...’ म्हटले हाच गुन्हा ठरला भावाने मोठ्या भावाचा गळा चिरला

नागपूर/क्राईम रिपोर्टर

काही लोक इतके उद्धट असतात कि वडीलधाऱ्या माणसाने त्यांना चांगले सांगितले तरी राग येतो आणि रागाच्या भरात त्यांच्या हातून काहीही घडते. नागपूर जिल्ह्याच्या कळमना येथे अशाच एका घटनेत मोठ्या भावाने लहान भावाला केवळ जेवण करून घे इतकेच म्हटले त्याचा लहान भावाला इतका राग आला कि त्याने मोठ्या भावाला शिवीगाळ केली. इतकेच नव्हे तर रागाच्या भरात त्याने विळीने गळा चिरून मोठया भावाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. दरम्यान मोठा मुलगा मृत्युमुखी ...पान २ वर

## आयुष्याची ‘रिल’ दारूच्या व्यसनामुळे वाया गेली मुलाला ठार मारून वडिलांनी आत्महत्या केली







पीआय निलेश गायकवाड

जळगाव/क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस हा केवळ समाजासाठीच नव्हे, तर कुटुंबासाठी सुद्धा तापदायक ठरलेला असतो. कारण दारूच्या नशेत घरी येवून तमाशा करणे, बाहेर कुणाशी तरी भांडणे करून ती लफडी घरी आणणे, कुटुंबातील लोकांना त्रास देणे, दारू प्यायल्यावर घरातील लोकांना शिवीगाळ तसेच मारहाण करणे. यामुळे अशा दारुड्या माणसाला कुटुंबातील लोकही वैतागलेले असतात. शेवटी रक्ताचे नाते असले तरी रोज रोज किती त्रास सहन करणार माणसाच्या सहनशीलतेलाही अंत असतो. अशा वेळी जेंव्हा सहनशीलता संपते तेंव्हा माणूस नाईलाजाने टोकाचा निर्णय घेतो त्यातूनच पुढे कुटुंब उध्वस्त होते. विशेष म्हणजे जी हुशार माणसे असतात. ज्यांच्या अंगी चांगली कला असते अशी माणसे जेंव्हा दारूच्या आहारी जातात, तेंव्हा त्यांच्यातला चांगुलपणा माणुसकी आणि कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी सारे काही संपलेले असते. जळगाव जिल्ह्यातील एरंडोलमध्ये राहणारे विठ्ठल पाटील हे लष्करातून निवृत्त झालेले माजी सैनिक होते, निवृत्ती नंतरचे जीवन गावी सुखासमाधानाने घालवावे हीच त्यांची इच्छा होती, पण त्यांच्या या इच्छेवर त्यांच्या दारुड्या मुलाने पाणी फेरले आणि त्यानंतर कुटुंबात असेकाही घडले कि संपूर्ण कुटुंब उध्वस्त झाले. विठ्ठल पाटील यांचा मुलगा चांगला रील मास्टर होता तो उत्कृष्ट रिल्स बनवायचा रीलसच्या माध्यमातून त्याने पैसा आणि प्रसिद्धी मिळवली. पण दारूच्या व्यसनात सर्व काही गमावण्याची वेळ आली. दारूच्या नशेत तो कुटुंबाला इतका त्रास द्यायचा कि त्याच्या भीतीने आई वडील आणि पत्नी कधी कधी नातेवाईकांकडे जावून रहायचे त्यामुळे विठ्ठल पाटील खचले होते, अस्वस्थ झाले होते. अखेर या त्रासातून कुटुंबाला वाचवण्यासाठी त्यांनी टोकाचा निर्णय घेतला त्यांनी २ लाखांची सुपारी देवून दारुड्या विकिची हत्या घडवून आणली. पण मुलाच्या हत्येच्या पापाचा भार वृद्ध बाप किती काल सहन करणार? अखेर त्यांनी आत्महत्या केली. मात्र मृत्युपूर्वी लिहलेल्या सुसाईड नोटमध्ये त्यांनी आपणच आपल्या मुलाच्या हत्येची सुपारी दिल्याची कबुली दिली. या घटनेमुळे संपूर्ण एरंडोल तालुका हादरून गेला आहे.



जळगाव जिल्ह्यातील एरंडोल या तालुक्याच्या ठिकाणी वृंदावन नगर परिसरात विवाहीत विकीहा त्याची पत्नी शितल, आई संगिता आणि वडील विठ्ठल सखाराम पाटील अशांसह रहात होता. पाच महिन्यापुर्वी विकीहा त्याची पत्नी शितलच्या बाळाचा बाप झाला. रिल्सच्या माध्यमातून मिळणारी कमाई आणि सेवानिवृत्त सैनिक असलेल्या वडीलांची पेंन्शन अशा दुहेरी कमाईच्या बळावर त्यांचा परिवार सुखाने सुखाने सुरु होता. एकंदरीत सर्वकाही सुरळीत सुरु असतांना त्याला मद्यप्राशन करण्याचे व्यसन मोठ्या प्रमाणात ...पान २ वर

## पहिल्या पतीशी संबंध त्याला नाही पटले दुसऱ्या पतीने अखेर पत्नीचे मुंडके छाटले





नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

पहिल्या नवऱ्याला सोडून एखादी बाई जेंव्हा दुसरे लग्न करते तेंव्हा तिने पहिल्या पतीशी असलेले संबंध तोडून टाकायचे असतात. पण काही महिला एकाच वेळी पहिल्या आणि दुसऱ्या पतीशीही संबंध ठेवतात, पण हे धोकादायक असते. यातून दुसऱ्या पतीच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि मग त्याच्या हातून काहीही घडू शकते. मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील विरार फाटा येथे गुरुवारी एका बॅगेत अनोळखी महिलेचे शीर सापडले होते. मात्र तिच्या मृतदेहाजवळ सापडलेल्या पर्समुळे अवघ्या २ दिवसात पोलिसांनी या हत्या प्रकरणाचा पर्दाफाश केला. मयत महिला ही पूर्वी बारबाला होती. ती विवाही होती. तिचा पती कोलकत्यात राहतो असे असतानाही तिने नालासोपाऱ्यातील हरीश हिप्परगी याच्याशी विवाह केला त्याच्या पासून तिला २२ वर्षाचा मुलगा आहे. मात्र हरीश बरोबर संसार करीत असतानाही ती पहिल्या नवऱ्याकडे कोलकत्याला जावून रहायची हे हरीशला मान्य नव्हते आणि आतातर ती हरीशच्या मुलाला घेवून कोलकत्याला जाणार होती. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला आणि याच वादातून हरीशने तिची हत्या केली व तुझी आई कोलकत्याला गेली असे मुलाला सांगितले. पण पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश केला.

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील विरारच्या मौजे टोकरे येथील विरार फाट्याकडे जाणाऱ्या रोडवरील पिरकुंडा दर्ग्याच्या पुढे एका बॅगेतील पिशवीत महिलेचे मुंडके गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास आढळल्याने खळबळ उडाली होती. २४ तासांत ओळख पटवून या महिलेच्या हत्येचे गूढ उकलण्यात गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाले आहे. आरोपी पतीने पुत्रप्रेमापोटी पत्नीची निर्घृणपणे हत्या केली आहे. या आरोपीला तपास व चौकशीसाठी मांडवी पोलिसांच्या ताब्यात देणार असल्याची माहिती शनिवारी पत्रकार परिषदेत पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी दिली आहे. गुरुवारी संध्याकाळी महिलेचे मुंडके मिळाल्यानंतर पोलीस आयुक्तालयातील सर्व गुन्हे शाखेचे पोलीस आणि स्थानिक पोलिसांनी महिलेची ओळख पटवून गुन्ह्याची उकल करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या टीमला घटनास्थळी सापडलेल्या बॅगेत एका ज्वेलरी शॉपचे पाकीट मिळाल्याने महिलेची ओळख पटली. त्यानंतर ती महिला नालासोपाऱ्याच्या रेहमत नगर येथील रोनक अपार्टमेंटमध्ये राहत असल्याची माहिती मिळाली. तसेच आरोपीने हत्या करून महिलेचा मृतदेह गोणीत भरून दुचाकीवरून ...पान २ वर

## पत्नीचे वागणे पतीला चांगलेच टोचले दारुच्या नशेत तिला दगडानेच ठेचले



डहाणू/क्राईम रिपोर्टर

आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या लोकांना प्रामुख्याने दारूचे व्यसन असते. अगदी महिलाही दारू पितात. त्यामुळे दारूच्या नशेत पती पत्नीमध्ये नेहमी वाद होतात. आणि या वादातून काहींचे जीवही गेलेले आहेत. कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धापशीपाडा येथे अशाच एका घटनेत दारूच्या नशेत पती–पत्नीमध्ये वाद झाला. हा वाद इतका वाढला कि चिडलेल्या पतीने दगडाने ठेचून पत्नीची हत्या केली.

पतीने पत्नीची दगडाने ठेचून हत्या केल्याची धक्कादाक घटना समोर आली आहे. पालघर जिल्ह्यातील थेरोंडा–धापशीपाडा येथे ही घटना घडली आहे. गुलाब सुरेश भोईर (वय ५८) असे मृत महिलेचे नाव असून या पत्नीची हत्या करणाऱ्या आरोपी पतीला कासा पोलिसांनी अटक केली आहे. सुरेश रामा भोईर ...पान २ वर

## पर्दाफाश झाला पत्नीच्या पापाचा ‘ओम’टॅटूमुळे खुनाला फुटली वाचा



मयत सिद्धेश्वर भिसे





आरोपी योगीता

पुणे (भोर)/क्राईम रिपोर्टर

कोणताही गुन्हेगार कितीही शातील असला तरी कधी ना कधी पोलिसांच्या जाळ्यात अडकतो. कारण गुन्हा करताना तो काही ना काही पुरावा नकळत मागे ठेवून जातो आणि हाच पुरावा पुढे त्याच्या मानेभोवतीचा फास बनतो. पुण्यात अशाच एका घटनेत अनैतिक संबंधात अडकलेल्या एका महिलेने आपल्या प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढला. परंतु मृतदेहाच्या शरीरावरील ओमच्या टॅटूने व शर्ट वरील टॅगने या खून प्रकरणाला वाचा फोडली आणि आरोपी अलगद पोलिसांच्या जाळ्यात अडकले.

पुणे येथील हडपसर येथील ससानेनगर येथे सिध्देश्वर भिसे हा पत्नी योगिता आणि मुलासह राहयला आहे. भिसे पती पत्नी हे दोघेही मुळचे धाराशिव जिल्हयातील असून गेल्या पाच वर्षापूर्वी ते पुण्यात कामाधंदाच्या शोधात आले.येथे कामधंदा करीत असताना हडपसर येथे ससानेनगर येथे ते भाडयाने खोली करून राहू लागले. सिध्देश्वर हा पुण्यातील एका खाजगी कंपनीत काम करीत होता. तर योगिता ही हडपसर भागातील एका कारखान्यात काम करू लागली. या दोघांचा संसार बहरत फुलत चालला असताना सिध्देश्वर याला दारू पिण्याचे ...पान २ वर

## जन्मदात्या आईला त्रास द्यायचा फार डॉक्टरने केले सख्ख्या भावालाच ठार

अहिल्यानगर/क्राईम रिपोर्टर



रक्ताची नाती कधी कधी रक्तरणजीत ठरतात. आणि त्याला करणेही तशीच असतात. कारण कुटुंबातील एखाद्या माणसामुळे इतरांना जर त्रास होत असेल तर सुरुवातीला नात्यातील एकोपा टिकवण्यासाठी त्रास देणाऱ्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. पण तो ऐकलाच नाही तर मग नात्यातल्याच माणसाकडून त्याचा शेवट केला जातो. अहिल्यानगर जिल्ह्यातील न येथे राहणारा सोमनाथ पाठक हा दारू पिवून आईला आणि आपल्या मुलाला मारहाण करीत असे. त्यामुळे त्याला समजवण्यासाठी त्याचा डॉक्टर असलेला मोठा भाऊ सातवड येथे गेला होता. पण त्याच्या समोरच सोमनाथने आईला आणि आपल्या मुलाला मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे चिडलेल्या डॉक्टर भावाने आईसामोरच भावाची हत्या केली.

पाथर्डी तालुक्यातील सातवड येथील तरुणाच्या खुनाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. दारू पिऊन आई व स्वत:च्याच मुलाला मारहाण करत असल्याने डॉक्टर असलेल्या सख्ख्या भावानेच त्याचा खून केल्याचे पोलिस तपासात ...पान ६ वर

## लग्नाच्या घाईने प्रेमाची शोकांतिका झाली प्रेयसीला मारुन प्रियकराने आत्महत्या केली









बेळगावी/क्राईम रिपोर्टर

लग्न हा माणसाच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा असतो. त्यामुळे किती जरी निस्सीम प्रेम असले तरी लग्नाचा निर्णय विचारपूर्व आणि अत्यंत समजुतदारीने घ्यायचा असतो. बेळगाव नजीकच्या शहापूरमध्ये राहणाऱ्या ऐश्वर्या व प्रशांतचे प्रेम होते. मात्र प्रशांतला लग्नाची घाई झाली होती, तर ऐश्वर्याला मात्र करियर करायचे होते. त्यामुळे त्याने तिच्या मागे लग्नाचा तगादा लावला तरी ती त्याच्याकडे लक्ष देत नव्हती. त्यामुळे चिडलेल्या प्रशांतने रागाच्या भारत तिच्या घरी जावून तिची हत्या केली आणि स्वत:ही विष पिवून आत्महत्या केली.

बेळगावी मधील शहापूर येथील नवव्या गल्लीत नाथ पै सर्कल जवळ ऐश्वर्या लोहार ही आपल्या आई आजी सोबत राहयला आहे. गेल्या दोन वर्षापासून तिचे प्रशांत कुंडेकर याच्याबरोबर प्रेमसंबंध चालू होते. ऐश्वर्या हिच्या वडिलांचे म्हणजे महेश लोहार याचे गेल्या १२ वर्षापूर्वी निधन झाल्याने तिचा सांभाळ पालन पोषण हे तिच्या आईने आणि आजीने केलेले होते. घरची परिस्थीती तशी बेताचीच म्हणून गेल्या वर्षभरापासून ती एका खाजगी ठिकाणी काम करीत होती. ...पान ६ वर

## अभिषेकची चुगली करुन संतोष फसला विनाकारण आपला जीव गमावून बसला

सोलापूर/क्राईम रिपोर्टर

चुगली हा अत्यंत संतापजनक प्रकार आहे. एखाद्या माणसाची जर कुणी चुगली केली तर तो माणूस चुगली करणाऱ्याला सोडत नाही. सोलापूरच्या भवानी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महालक्ष्मी झोपडपट्टीत रहाणारा नागेश विटकर हा अभिषेक वित्कारच्या पत्नीला भेटून अभिषेक जुगार खेळतो मटका लावतो, त्याला बाईचे व्यसन लागले आहे अशी चुगली करायचा त्यावरून अभिषेक व त्याच्या पत्नीचे भांडण व्हायचे. त्यामुळे चिडलेल्या अभिषेकने संतोषची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी अभिषेक व त्याच्या साथीदारांना अटक केली आहे.

व्यसनाची माहिती पत्नीला सांगितल्याचा राग मनात धरून तरुणाला हातोडीच्या लाकडी दांडक्याने मारून खून केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. नागेश संतोष विटकर (वय २०, रा. महालक्ष्मी झोपडपट्टी, भवानी पेठ) असे मयत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी मृताची आई लिंबुबाई संतोष विटकर (वय ३५, रा. भवदनी पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अभिषेक अंबादास विटकर (रा.जुना घरकुल), अविनाश अंबादास बंदपट्टे (रा. महालक्ष्मी झोपडपट्टी, भवानी पेठ) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. काही दिवसांपूर्वी मयत नागेश याने आरोपी अभिषेकच्या ...पान ६ वर

## शिवीगाळ केल्याचा भयंकर राग आला चिडलेल्या अक्षयने शेतमजुराचा खून केला



बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

शीघ्रकोपी माणूस खूप धोकादायक असतो. कारण त्याला लहान सहान गोष्टींवरून लगेच राग येत असतो. समोरच्याने बोललेले त्याला सहन होत नाही. त्यामुळे रागाच्या भरात तो कोणत्याही थराला जातो. सिंदखेड राजा येथील अक्षय मेहर हा सुद्धा असाच शीघ्रकोपी होता. एकेदिवशी त्याच्या शेतात काम करणाऱ्या मजुराने चारचौघात त्याला शिवीगाळ केली. त्यामुळे चिडलेल्या अक्षयने त्याचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी अक्षयला अटक केली आहे.



आरोपी अक्षय





१८ फेब्रुवारी मंगळवार दुपारचे चार वाजले असावेत, सिंदखेड (राजा) पोलीस स्टेशनचे कर्मचारी आपल्या कामात व्यस्त असताना, पोलीस स्टेशन पासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या, मोती तलावाच्या भिंतीजवळ एका अनोळखी व्यक्तीचे प्रेत पडले असल्याची खबर मिळाल्याने, पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली, घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी होती. मोतीतलावाच्या भिंतीजवळ ५० फूट खोल दरीत एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह पडला होता. पोलिसांनी मृतदेहाचे ...पान ६ वर

पान १ वरून...

## जेवून घे म्हटले हाच गुन्हा ठरला ...

पडला, तर त्याचा खून करणारा धाकटा तुरुंगात केला. त्यामुळे त्या दोघांना जन्म देणाऱ्या आईची अत्यंत केविलवाणी स्थिती झाली आहे. आईने थोरल्या मुलासोबत जेवन केले आणि घराबाहेर गप्पा करीत बसली. तेवढ्यात लहान मुलगा घरी आला. त्याला मोठ्या भावाने उशिरा येण्याचे कारण विचारले. त्याने उलटसुलट उत्तर देऊन टाळाटाळ केली. त्यामुळे भावाने रागावले आणि पटकन जेवन करुन झोपण्यास सांगितले. त्यामुळे चिडलेल्या भावाने मोठ्या भावाशी वाद घातला आणि घरातून विळा आणून आईसमोरच त्याचा गळा चिरला. पोटचा मुलगा क्षणार्धात रक्ताच्या थारोळ्यात पडून दिसल्यामुळे आईने हंबरडा फोडला आणि मदतीसाठी शेजाऱ्यांनी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत गंभीर जखमी युवकाने प्राण सोडला होता. अखेर पोटच्या तरुण मुलाच्या आईच्या डोळ्यासमोरच श्वास थांबला. ही थरारक घटना कळमना पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी रात्री घडली. राजू कुंभलाल यादव (३०) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आईच्या तक्रारीवरून मुलगा विजय यादव (२३) याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. गुलशननगर येथील रहिवासी रमा यादव (६०) यांना तीन मुले आणि एक मुलगी आहे. मुलगी शेजारीच राहाते. राजू हा मजुरी करायचा तर राजेश कळमना बाजारात मिरची व्यापाऱ्याकडे काम करतो. विजय हा वस्तीत फिरून टवाळक्या करतो. मंगळवारी रात्री सर्वजन घरी होते. आई जेवन करून नातीसोबत गप्पा मारत होती.राजू हा सुध्दा जेवन करून बसला होता. त्याच वेळी विजय घरी आला. राजूने त्याला जेवन करून घे, असे म्हटले. यावरून त्याने राजूला शिवीगाळ केली. अचानक तो सुडाने पेटला. मोठ मोठ्याने ओरडून तो शिवीगाळ करीत होता. यावरूनच दोन भावात वाद पेटला. वाद विकोपाला जाताच विजयने स्वयंपाक घरातून विळा आणला आणि राजूच्या छाती आणि डोक्यावर वार करून त्याला रक्तबंबाळ केले. आईने आरडा ओरड केली तर नातीनही रडत घरी गेली. वडिलांना बोलावून आणले. जखमी अवस्थेत राजूला मेयो रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. माहिती मिळताच कळमना पोलिसांचे पथक मेयो रूग्णालयात पोहोचले. कुटुंबीयांचे जबाब नोंदवून तक्रारीवरून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला. काही वेळातच आरोपी विजयला अटक केली. त्याला न्यायालयात उपस्थित करण्यात आले. शवविच्छेदनानंतर पार्थिव कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. या हत्याकांडानंतर नातेवाईकांची घरी गर्दी झाली. रमा या धाय मोकलून रडत होत्या. त्यांचा मोठा मुलगा मृत पावला तर लहान मुलगा कारागृहात जाणार होता. रमा यांना शेजारी राहणाऱ्या मुलीने स्वतःच्या घरी नेले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

## आयुष्याची 'रिल' दारूच्या व्यसनामुळे ...

जडले. त्यामुळे सुरु झाली त्याच्या परिवाराची अधोगती. हितेश उर्फ विकी विठ्ठल पाटील हा इंस्टाग्राम या सोशल मिडीया प्लॅटफॉर्म वरील रिल स्टार होता. त्याचे असंख्य चाहते होते. रिल्सच्या माध्यमातून त्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळत होती. रिल्सच्या माध्यमातून तो महिन्याला जवळपास ३० ते ३५ हजार रुपयांची कमाई देखील करत होता. अवघा २४ वर्ष वयाचा विकी रिल्सच्या माध्यमातून चांगली कमाई करत असल्यामुळे त्याच्या बँक खात्यात पैसे खुळखुळ करत होते. कामधंदा न करता कमी वयात केवळ रिल्सच्या माध्यमातून लक्ष्मी प्राप्ती होत असल्यामुळे तो व्यसनाच्या आणि रागाच्या आहारी गेला. अल्लड वयात त्याला दारु पिण्याचे व्यसन जडले. मद्यप्राशन केल्यानंतर तो आपल्या जन्मदात्या पित्याला मारहाण देखील करत असे. घरातील सर्वच सदस्य त्याच्या शिवीगाळ आणि मारहाणीच्या त्रासाला वैतागले होते. एरंडोल येथील रहिवासी सेवानिवृत्त सैनिक विठ्ठल सखाराम पाटील यांचे धरणगाव तालुक्यातील भवरखेडा हे मुळ गाव आहे. भवरखेडा या गावी त्यांचे भाऊ नामदेव सखाराम पाटील व त्यांचा मुलगा भालचंद्र नामदेव पाटील राहतात. विक्कीला मोठ्या प्रमाणात जडलेले दारुचे व्यसन सोडवण्यासाठी शिर्डी येथील व्यसनमुक्ती केंद्रात प्रयत्न देखील करण्यात आले. मात्र ते प्रयत्न निष्फळ ठरले. त्याचे दारु पिण्याचे व्यसन दिवसेंदिवस वाढतच होते. दारुची मोठ्या प्रमाणात धुंदी चढली म्हणजे तो त्याच्या पत्नीला व जन्मदात्या वडीलांना मारहाण करत असे. वेळ प्रसंगी आईला देखील शिवीगाळ करायचा. त्याच्या त्रासाचा अतिरेक झाला म्हणजे परिवारातील सर्व सदस्य त्यांच्या मुळगावी भवरखेडा येथे नामदेव पाटील यांच्याकडे राहण्यास जात होते. त्यानंतर विकीत्यांना घेण्यासाठी भवरखेडा या गावी जात असे. हा नेहमीचा ठरलेला प्रकार होता. पुत्र व्हावा ऐसा ज्याचा तिन्ही लोका झेंडा या म्हणीला विकीपात्र ठरला नव्हता. विठ्ठल पाटील यांच्या नशीबी अपत्य सुख नव्हते. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सोमवारी नेहमीप्रमाणे विकीमद्याच्या नशेत बेधुंद झाला होता. या दिवशी त्याने मद्याच्या नशेत पत्नी शितल हिस फोन करुन चिकन बनवण्याचे अर्थात मांसाहारी स्वयंपाक करण्याचे फर्मान सोडले. आज एकादशी आणि सोमवार असल्याचे योग्य कारण पुढे करत पत्नी शितलने त्याला आज मी चिकन बनवणार नाही असे स्पष्ट सांगत नकार दिला. पत्नी शितलचा नकार ऐकून त्याच्या रागाचा पारा सरकन वर चढला. त्याने फोनवरच तिला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ सुरु केली. त्यामुळे हा प्रकार तिने तिचे सासरे अर्थात विक्कीचे वडिल विठ्ठल पाटील यांच्या कानावर टाकला. आता नेहमीप्रमाणे विकी घरी येवून आपल्याला शिवीगाळ आणि मारहाण करेन अशी भिती विठ्ठल पाटील यांना सताऊ लागली. त्यामुळे नेहमीप्रमाणे त्यांनी भवरखेडा येथे जाण्याचे निश्चित केले. त्यांनी सुन शितल हिस त्यांच्या ताब्यातील ॲक्टीव्हा या दुचाकीवर बसवून विखरण गाठले. तेथून त्यांनी पत्नी संगिताला देखील सोबत घेत ट्रिपलसिट भवरखेडा गाठले. सायंकाळी विकी भवरखेडा येथे आपला शोध घेत येईल आणि नेहमीप्रमाणे आपल्याला मारहाण व शिवीगाळ करेल अशी भिती विठ्ठल पाटील यांना सताऊ लागली. त्यामुळे त्याला रस्त्यातच अटकाव केला पाहिजे असा विचार त्यांच्या मनात आला. ती भिती त्यांनी भाऊ नामदेव पाटील व पुतण्या भालचंद्र पाटील यांच्याकडे व्यक्त केली. त्यामुळे तिघांनी संगनमताने त्याला वाटेतच अडवून समजावून सांगण्याचे निश्चित केले. सायंकाळी जेवण आटोपून विठ्ठल पाटील, भाऊ नामदेव पाटील व त्यांचा मुलगा भालचंद्र पाटील अशा तिघांनी वेगवेगळ्या मोटार सायकलने गावातील जेसीबी चालक रविंद्र पाटील यास सोबत घेत मार्गक्रमण केले. विठ्ठल पाटील यांच्या सांगण्यानुसार जेसीबी चालक रविंद्र पाटील हा देखील त्यांच्यासोबत आला होता. रविंद्र पाटील याने त्याच्या सोबतीला त्याचा मित्र किशोर उर्फ दादा पाटील याला देखील घेतले. सर्वजण एरंडोलच्या दिशेने मार्गक्रमण करत असतांना रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास वाटेत टोळी गावानजीक त्यांना मद्यधुंद अवस्थेत विकी भेटला. या ठिकाणी सर्वांनी मिळून त्याला त्रास न देण्याबाबत समजावून सांगण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. मात्र मद्याच्या आहारी गेलेला विकी कुणाचेही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हता. सर्व जण त्याला समजावून सांगण्याचा पुरेपुर प्रयत्न करत होते. याउलट त्याने मद्याच्या आणि रागाच्या नशेत त्याचे वडील विठ्ठलपाटील, काका नामदेव पाटीलआणि इतरांना शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याच्या या नेहमीच्या मारहाणीच्या त्रासाला सर्व जण प्रचंड वैतागले होते. अखेर विकीचे वडील विठ्ठल पाटील यांचा संयम सुटला. त्यांनी सोबत असलेला जेसीबी चालक रविंद्र पाटील यास आडोशाला नेले. आडोशाला नेत त्यांनी रविंद्र पाटील यास सांगितले की तु विकीचा कायमच काटा काढ. मी तुला दोन लाख रुपये देतो. तो पुन्हा घरी परत येता कामा नये. त्यानंतर रविंद्र पाटील व त्याच्यासह केवळ सोबती म्हणून आलेला किशोर पाटील असे दोघेच जण विकी सोबत थांबले. इतर सर्व जण आपल्या मुळ गावी भवरखेडा येथे निघून आले. यावेळी आपल्याला अजून मद्य प्राशन करायचे आहे असे विकी ने रविंद्रला म्हटले. विकीचा कायमचा काटा काढायचा असल्यामुळे रविंद्रने त्याला चल असे म्हणत दुचाकीवर बसवले. रविंद्रसह त्याचा सोबती किशोर आणि मद्याच्या नशेतील विकीअसे तिघेजण मोटार सायकलवर बसले. टोळी गावाच्या पुढे बोरगाव नजीक एका हॉटेलवर तिघे जण गेले. याठिकाणी रविंद्र आणि विकी या दोघांनी मद्यप्राशन केले. अगोदरच मद्याच्या आहारी गेलेल्या विकी ने अजून मद्यप्राशन केले. त्यामुळे त्याचे भान हरपले. मला पुणे येथे जायचे आहे, मला हायवे वर सोड असे तो रविंद्रला म्हणू लागला. पोटात अगोदरच दारुचा कोटा पुर्ण झालेला असल्यानंतर देखील त्याने सोबत अजून एक दारुची बाटली घेतली. तिघे जण महामार्गावर आले असतांना विक्कीला पुन्हा दारु पिण्याची इच्छा झाली. त्यामुळे तो रविंद्रला हॉटेलवर घेऊन चल असे म्हणाला. त्यामुळे रविंद्रने त्याला पुन्हा नजीकच्या हॉटेलवर दारु पिण्यासाठी नेले. यावेळी पुन्हा रविंद्र आणि विकी या दोघांनी हॉटेल परिसरात मोकळ्या मैदानावर दारु घेतली. रविंद्रने विक्कीला पुर्णपणे दारुच्या अधीन केले. त्यानंतर तिघे जण मोटार सायकलवर बसून भवरखेडा शिवारातील एका शेतात असलेल्या शेडमधे झोपण्यासाठी गेले. या ठिकाणी रात्रीच्या वेळी कुणीही नसते याची रविंद्रला चांगल्याप्रकारे माहित होते. पुढे नेमके काय होणार आहे आणि रविंद्रच्या मनात काय सुरु आहे याबाबत सोबत असलेला किशोर पाटील मात्र अनभिज्ञ होता. यावेळी अनभिज्ञ असलेल्या किशोर पाटील यास त्याच्या घरुन सारखे सारखे फोन येत होते. फोनवर त्याला घरी बोलावणे सुरु होते. त्यामुळे किशोरने रविंद्रला म्हटले की मला घरी जायचे आहे, मला घरुन सारखे सारखे फोन येत आहे. त्यामुळे रविंद्रने त्याला त्याच्या ताब्यातील मोटार सायकल किशोरला देत घरी जाण्यास सांगितले. आता निर्जन शेतातील शेडमधे केवळ मद्यधुंद विकी आणि रविंद्र असे दोघेच जण राहिले होते. रविंद्रने विकीसोबत मद्यप्राशन केले असले तरी तो जाणीवपुर्वक भानावर होता. एकाच खाटेवर दोघे झोपल्यानंतर काही वेळाने रविंद्र हळूच उठला. विकी पुर्णपणे मद्याच्या आहारी गेला असल्याचे बघून त्याने जवळच असलेल्या शेतातून पाईपाला बांधलेली दोरी सोडून आणली. पुन्हा शेडमधे आल्यानंतर त्या दोरीने त्याने खाटेवर झोपलेल्या विक्कीला गळफास दिला. मद्याच्या आहारी असलेल्या विक्कीने अजिबात प्रतिकार केला नाही. अती मद्यपानामुळे त्याच्या अंगी प्रतिकार करण्याचे त्राण आणि भान राहिले नव्हते. विकीमरण पावल्याचे लक्षात आल्यानंतर परत जाण्यासाठी जेसीबी चालक असलेल्या रविंद्रजवळ मोटार सायकल नव्हती. त्याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल किशोर पाटील याला दिली होती. त्यामुळे परत जाण्यासाठी त्याने विक्कीचा चुलत भाऊ भालचंद्र यास फोन करत मोटार सायकल घेऊन येण्यास सांगितले. शेतात विकी गळफास दिल्याने मरण पावला असल्याचे भालचंद्र यास माहिती नव्हते. त्यामुळे तो आपल्याला मारहाण करेल असे समजून तो घाबरला. त्यामुळे भालचंद्रने एकट्याने जाण्याऐवजी वडील नामदेव यांना सोबत घेऊन जाण्याचे ठरवले. भालचंद्रने त्याचे वडील नामदेव यांना झोपेतून उठवले. तो वडील नामदेव पाटील यांना मोटार सायकलवर डबलसिट घेऊन शेतात रविंद्रजवळ आला. वाटेत त्यांना रविंद्र पायी पायी येतांना दिसला. त्यावेळी आपण विकीला गळफास देऊन ठार केल्याचे रविंद्रने दोघांना सांगितले. रविंद्रचे बोलणे ऐकून दोघे पिता पुत्र मनातून पार घाबरले. आता काय करायचे असा प्रश्न भालचंद्र आणी त्याचे वडील नामदेव यांना पडला. घटना काय घडली आहे आणि त्यावर आता काय उपाययोजना करायची हे विचारण्यासाठी त्यांनी मयत विक्कीचे वडील व माजी सैनिक विठ्ठल पाटील यांना फोनवर सांगत घराबाहेर येण्यास सांगितले. जेसीबी चालक रविंद्र पाटील, भालचंद्र पाटील व नामदेव पाटील असे तिघे जण मोटार सायकलने भवरखेडा गावात आले. विठ्ठल पाटील घरातून बाहेर आल्यानंतर रविंद्र आणि नामदेव यांच्यात विकीच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची यावर चर्चा झाली. दरम्यान भालचंद्र घरात झोपण्यास निघून गेला. चर्चेअंती विठ्ठल पाटील यांनी रविंद्रला त्याचे जेसीबी मशीन धरणानजीक पात्रात घेऊन येण्यास सांगितले. धरणाजवळ जेसीबीच्या मदतीने खड्डा खोदून त्यात विक्कीचा मृतदेह पुरण्याचे विठ्ठलने रविंद्रला सांगितले. जन्मदात्या बापाने मुलाचा मृतदेह गुपचूप पुरण्याचे काम रविंद्रला सोपवले. ठरल्यानुसार नामदेव आणि विठ्ठल हे दोघे भाऊ मोटार सायकलनेगोविंदबाबा धरणाच्या कोरड्या पात्रात आले. त्यांच्या पाठोपाठ रविंद्र त्याचा जेसीबी घेऊन आला. त्याठिकाणी जेसीबी थांबल्यानंतर विठ्ठल आणि रविंद्र या दोघांनी शेताच्या शेडमधील विक्कीचा मृतदेह मोटार सायकलवर मधोमध बसवून जेसीबी जवळ आणला. जेसीबीच्या मदतीने खड्डा खोदून तो मृतदेह त्या खड्ड्यात विठ्ठलच्या सांगण्यावरुन जेसीबीने उचलून पुरण्यात आला.या सर्व घटनाक्रमात दुसरा दिवस अर्थात २५ फेब्रुवारीचा दिवस सुरु झाला. रात्रीचे दोन वाजले होते. विक्कीचा मृतदेह खड्ड्यात पुरल्यानंतर तिघेही आपापल्या घरी निघून गेले. त्यानंतर पहाटेच्या सुमारास भवरखेडा येथे घरातील सर्व सदस्य हजर होते. मात्र रात्रीच्या प्रसंगाची मयत विक्कीची पत्नी शितल हिस कोणतीही कल्पना नव्हती. विकी ला रागाच्या भरात मारहाण करण्यात आली एवढे तिला समजले होते. मात्र विक्कीला ठार करण्यात येवून त्याचा मृतदेह धरणाच्या पात्रात जेसीबीने पुरण्यात आला असल्याचे तिला माहिती नव्हते. विकी जीवंत असल्याचे भासवून विठ्ठल पाटील यांनी त्यांचे व्याही अर्थात सुन शितलचे वडील निवृत्ती पाटील यांना फोन करुन भवरखेडा येथे बोलावण्यात आले. तुम्ही भवरखेडा येथे येऊन विकीची समजूत घाला असे त्यांना सांगण्यात आले. त्यानुसार शितलचे वडील भवरखेडा येथे आले. मात्र बराच वेळ वाट बघूनही विकीभवरखेडा येथे आला नाही. त्यामुळे शितलचे वडील आपल्या घरी चाळीसगाव तालुक्यातील दहीवद येथे निघून गेले. या सर्व घटनाक्रमानंतर विठ्ठल पाटील मनातून फार अस्वस्थ झाले. आपल्या पोटच्या मुलाच्या खूनास आपणच जबाबदार असल्याचे शल्य त्यांच्या मनाला बोचू लागले. राहून राहून त्यांचे मन त्यांना काही केल्या स्वस्थ बसू देत नव्हते. मी एरंडोल येथे जावून विकीला बघून येतो असे उद्विग्न मनस्थितीत म्हणत विठ्ठल पाटील दुपारी जागेवरुन उठले. ते एरंडोल येथील घरी एकटेच आले. घरातील दारे खिडक्या बंद करुन त्यांनी आत्महत्या करण्याचे मनाशी निश्चित केले. तत्पुर्वी त्यांनी एक सुसाईड नोट लिहून काढली. त्यात हितेश उर्फ विकीयाच्या मरणास आपणच कारणीभूत असल्याचे त्यांनी कबुल करत तसे नमुद केले. रात्री दोन वाजता त्याला धरणाच्या पात्रात आपण पुरुन आल्याचे देखील त्यांनी नमुद केले. किती दिवस मुलाच्या हातून मार खायचा ...सॉरी अशा स्वरुपाचा काही ओळींचा मजकूर त्यांनी अहिराणी भाषेत लिहून काढला. त्यानंतर त्यांनी घराच्या छ्ताला गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. त्यानंतर सायंकाळ झाली तरी देखील विठ्ठल पाटील भवरखेडा येथे परत आले नाही. त्यामुळे घरातील सर्वच सदस्य हवालदिल झाले. विठ्ठल पाटील अद्याप घरी का परत आले नाही म्हणून त्यांना मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र ते मोबाईल देखील उचलत नव्हते. त्यामुळे नक्कीच काहीतरी गडबड असल्याची शंका सर्वांच्या मनात येण्यास सुरुवात झाली. विचारात पडलेली त्यांची पत्नी संगिता आणि पुतण्या भालचंद्र असे दोघे मोटार सायकलने एरंडोल येथे जाण्यास निघाले. एरंडोल येथे घरी आल्यानंतर घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बराच वेळ आवाज देऊनही आतून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. अखेरीस एरंडोल पोलिस स्टेशनला या प्रकाराची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच एरंडोल पोलिस स्टेशनचे पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. आतून बंद असलेल्या घराचा दरवाजा तोडून पोलिस पथकाने प्रवेश केल्यानंतर विठ्ठल पाटील यांनी घराच्या छताला गळफास घेत आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. या घटनेप्रकरणी एरंडोल पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. दरम्यान मयत विठ्ठल पाटील यांच्या खिशात सापडलेल्या सुसाईड नोटनुसार त्यांचा मुलगा हितेश उर्फ विकी याचा मृतदेह धरणपरिसरात पुरला असल्याची माहिती समोर आली. या माहितीच्या आधारे पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, चाळीसगाव परिमंडळाच्या अप्पर पोलीस अधीक्षिका कविता नेरकर, धरणगाव पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पवन देसले आदींनी घटनास्थळी भेट दिली. जेसीबीच्या मदतीने विकीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला त्यावेळी अमळनेर उप विभागाचे डीवायएसपी विनायक कोते व तहसीलदार महेश सुर्यवंशी उपस्थित होते. विकीचा मृतदेह उत्तरीय तपासणीकामी जळगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रवाना करण्यात आला. त्यानंतर त्याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेप्रकरणी सर्व बाजूने माहिती संकलीत झाल्यानंतर त्याची पत्नी शितल पाटील हिने दिलेल्या फिर्यादीनुसार एरंडोल पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. शीतल पाटील हिने फिर्यादीत म्हटले की तिचे सैन्यातून निवृत्त झालेले सासरे हे शरीराने मजबूत नव्हते मात्र तिचा पती शरीराने धडधाकट होता. त्यामुळे पती विकीयास मारणे एकट्याचे काम असू शकत नाही. एकंदरीत मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी शितल पाटील हिने तीचे आत्महत्या करणारे मयत सासरे विठ्ठल सखाराम पाटील, चुलत सासरे नामदेव सखाराम पाटील, चुलत दिर भालचंद्र नामदेव पाटील अशा तिघा संशयितांविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील अधिकच्या तपासात जेसीबी चालक रविंद्र पाटील याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला देखील संशयीत आरोपी करण्यात आले. एरंडोल पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक निलेश गायकवाड यांच्यासह सहायक पोलिस निरीक्षक रोहीदास गभाले, सहायक पोलिस निरीक्षक शंकर पवार, सहायक फौजदार राजेश पाटील, हे.कॉ. अनिल पाटील, कपील पाटील, पोलिस नाईक संदीप पाटील, मिलिंद कुमावत, सचिन पाटील, योगेश महाजन, पो. कॉ. प्रशांत पाटील व आकाश शिंपी आदींनी या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु केला.मयत विठ्ठल पाटील यांच्या बारावीत शिकणाऱ्या दुसऱ्या मुलाने सुमारे दोन वर्षापुर्वी घरातच आत्महत्या केली होती. त्यानंतर घडलेल्या या घटनेत त्यांनी स्वत: आत्महत्या केली व तत्पुर्वी त्यांच्याच मुलाची हत्या झाली. अशा प्रकारे एकाच घरातील तिघांचा अनैसर्गीक मृत्यु झाला आहे.

## पहिल्या पतीशी संबंध त्याला नाही...

नेला होता ती दुचाकी गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना मिळाल्यावर गुन्ह्याची उकल करण्यात त्यांना यश मिळाले आहे. त्यावरून आरोपी हरीश हिप्परगी (४९) याला शुक्रवारी रात्री ताब्यात घेतल्यावर गुन्ह्याची हकीकत पोलिसांना सांगितली. हरीश आणि त्याची मयत पत्नी उत्पला (५१) हे गेल्या अनेक वर्षापासून रेहमत नगर परिसरात राहत होते. पण उत्पला ही मुलाला पश्चिम बंगालला घेऊन जाणार असे बोलत असल्याने त्यांच्यामध्ये मुलांवरून कोटूंबिक वाद व्हायचे. हरीशचे मुलावर खूप प्रेम होते त्यामुळे त्याचा मुलाला नेण्यासाठी विरोध होता. याच कारणावरून हरिशने कंटाळून व रागाच्या भरात ८ जानेवारीला रात्री उत्पलाची गळा दाबून हत्या करत मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मुंडके शरीरापासून वेगळे करत ते एका ट्रॅव्हल्स बॅगमध्ये भरून झाडाझुडुपांमध्ये फेकून दिले. व उर्वरित शरीर एका गोणीत भरून प्रगती नगर येथील नाल्यात फेकून दिले. मुलाने आईबद्दल वडिलांना विचारल्यावर आरोपी पतीने आई उत्पला ही माहेरी पश्चिम बंगालला गेले असल्याचे सांगितले होते. सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, सपोनि सुहास कांबळे, पोहवा मुकेश तटकरे, रमेश आलदर, सागर बारवकर, प्रशांत पाटील, अमोल कोरे, राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, आतिश पवार, तुषार दळवी, मनोहर तारडे, मसुब प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे आणि सायबरचे सफौ संतोष चव्हाण यांनी केली आहे.

## पत्नीचे वागणे पतीला चांगलेच टोचले...

(वय ५८) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील थेरोंडा धापशीपाडा येथे एका महिलेची तिच्याच पतीने घरगुती वादातून गंभीर मारहाण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. ९ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास गुलाब सुरेश भोईर (वय ५२) हिला तिचा नवरा सुरेश रामा भोईर (वय ५८) याने घरगुती कारणावरून भांडण करत मारहाण केली. फिर्यादी रामदास सुरेश भोईर (वय ३१) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील थेरोंडा – धापशीपाडा येथे सुरेश रामा भोईर आणि त्याची पत्नी गुलाब सुरेश भोईर असे दांपत्य वास्तव्यास होते. दोघांचं लग्न होऊन ३५ वर्ष झालेली होती. पती आणि पत्नी दोघांनाही दारू पिण्याचे व्यसन होते. सुरेश भोईर याने त्याची पत्नी गुलाब हिला तू घरातून बाहेर का जाते? खरे सांग असे विचारले. यावरून रविवारी सायंकाळी चार वाजताच्या सुमारास दोघा पती आणि पत्नीमध्ये वाद झाला. वाद इतका टोकाला गेला की पतीने पत्नीला तिला थप्पड, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. इतकेच नव्हे, तर आरोपीने हातात दगड घेऊन पत्नीच्या डोक्यावर, छातीवर आणि पाठीवर जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात महिलेस गंभीर दुखापती झाल्या आणि त्यातच तिचा मृत्यू झाला. या घटनेवेळी फिर्यादी आणि इतरांनी आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने त्यांनाही मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी भारतीय दंड संहिता २०२३ चे कलम १०३(१) आणि ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा क्रमांक ३२/२०२५ प्रमाणे कासा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. मृतदेहाचा पोस्टमार्टम अहवाल प्राप्त झाला असून पुढील तपास कासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक अविनाश मांदळे आणि पोलीस उपनिरीक्षक किशोर पवार करीत आहेत. घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंपळे, तसेच कासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक अविनाश मांदळे यांनी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

## पर्दाफाश झाला पत्नीच्या पापाचा...

व्यसन लागले. सिध्देश्वर सकाळी कामाला गेला की, रात्री उशिराच घराकडे परतत होता.तो रोज रात्री दारू पिऊन घरी येत होता. घरी आला की, तो पत्नी योगिताबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत होता. याला कारण ही तसेच होते. योगिता ही काम करीत असलेल्या ठिकाणी धाराशिव जिल्यातीलच शिवाजी बसवंत सुतार हा ही काम करीत होता. त्याचे आणि योगिताचे विवाहबाहय संबंध जुळले होते. त्याची माहिती सिध्देश्वर याला मिळालेली होती. त्यामुळे तो दारू पिऊन रोज योगितला मारहाण करीत होता. तो तिला शिवाजी सुतार याचा नाद सोड आपला संसार सुखा समाधानाचा चालू आहे तो मोडू नकोस असे सांगत होता. परंतु योगिता ही शिवाजी सुतारच्या नादात इतकी पुढे गेलेली होती की, तिने त्याला आपले तन, मन, धन दिले होते. ती त्याला सोडायला तयार नव्हती. त्यामुळे सिध्देश्वर याने तिचे कामच बंद केलेले होते. त्यामुळे तिला शिवाजीला भेटता येत नव्हते. त्यामुळे तिचा जीव कासावीस होत होता. त्यामुळेच त्याची भांडणे आणखीन जोरात वाढलेली होती. त्या भांडणात तिने त्याला सांगितले की, मी काही त्याचा नाद सोडणार नाही, उलट नवरा म्हणून मला तु नको आहेस. मी पळून जाऊन त्याच्या बरोबरच राहणार आहे. यावर तो तिला मारबडव करीत होता. पण ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत, तुझ्यात काही दम नाही असे हिणवीत होते. त्यामुळे तो जास्तच त्रस्त होत होता. शिवाजी ही तिच्या जवानीवर मरत होता. ती काही सांगेल तसे तो वागत होता. त्याला माहित होते की,तिला तिच्या नवऱ्याचा त्रास आहे. पण तरी ही तो तिला सोडायला तयार नव्हता. ती ही त्याला सोडायला तयार नव्हती. दोघांची तळमळ वाढत होती म्हणून ते दोघे ही बाहेर हॉटेलमध्ये, लॉजवर भेटून जवानीची कसरत पुर्ण करीत होते. गेल्या दोन तीन वर्षापासून त्या दोघांचे संबंध वाढीस लागलेले होते. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा शेजाऱ्यात होत होती.काही केल्या ती त्याचा नाद सोडत नव्हती. म्हणून सिध्देश्वर हा तिच्यावर चिडत होता. एकदा तर त्याने भांडणात त्याने तिच्या गुप्तअंगाचा चावा घेऊन तिला वेदना दिलेल्या होत्या. तिला त्याचा त्रास सहन होत नव्हता. पण ती काही कमी नव्हती. ती भांडणात त्याला म्हणाली होती.मी तुझ्यासमोरच त्याच्याबरोबर झोपून मजा करते का नाही ते बघ. तुला काय करायचे ते कर. आपल्या बायको हाताबाहेर चालली आहे हे त्याने ओळखले होते म्हणून त्याने तिचा प्रियकर शिवाजी सुतार याला ही भेटून तु माझ्या बायकोचा नाद सोड असे सांगितले परंतु त्यावेळी शिवाजी ही त्याला म्हणाला की, तुझी बायको त्या कामासाठी मस्त आहे मग मी तिला कसे सोडणार त्याने असे तोंडावर त्याला बोलल्याने तो ही त्याचेवर चिडला होता. त्याने शिवाजी सुतार याला बघून घेण्याची भाषा केली होती. एकंदरीतच विवाहबाहय संबंधात योगिता ही प्रियकराच्या जास्तच आहरी गेलेली होती. तिला आता नवरा नकोच होता म्हणून तिने शिवाजी याला सांगितले की, तु माझ्या नवऱ्याचा कायमचा बंदोबस्त कर मी तुझीच आहे. तिच्यासाठी तो काहीही करायला तयार असल्याने तो ही सिध्देश्वर भिसे याला मार्गातून बाजुला करायला एका पायावर तयार झाला. त्या दोघांनी तसा प्लॅन केला.त्याला आपल्या मार्गातून हटवून त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याचा त्याचा विचार पक्का झालेला होता. सोमवार दि.३ मार्च २०२५ रोजी नेहमी प्रमाणे रात्रीच्या वेळेस सिध्देश्वर भिसे हा कामावरून येताना दारू पिऊनच घरी आला. आल्या आल्या त्याने बायकोबरोबर भांडण काढले,तिला चांगलीच मारबडव केली. याचा राग तिला आलेला होता.तिने रागाच्या भरात प्रियकर शिवाजी सुतार याला फोन लावून सांगितले की आज रात्री आपण मस्त पैकी मजा करू.तुला पाहिजे तसे सुख देते माझ्या घराकडे ये. पण आज माझ्या नवऱ्याची गेम झालीच पाहिजे तो ही तिच्या जवानीला भुलला असल्याने तिने सांगितले प्रमाणे आपल्या दुचाकीवरून रात्री ११च्या दरम्यान घरी आला. तसा तो ही दारूच्या नशेत होता. घरातील बेडरुमधील दुसऱ्या खोलीत तो तिच्याशी या कामाबाबत बोलत असताना त्याच्या बोलण्याचा आवाज बाहेरच्या खोलीत झोपलेल्या सिध्देश्वरच्या कानावर आला. तो तसाच आतील खोलीत आला. त्यावेळी मुद्दामच शिवाजी ही योगिताची साडी फेडत वरचे ब्लाऊजचे बटण काढत होता. बायकोच्या प्रियकराला आपल्या खोलीत बघून तो त्या दोघावर चिडला. पहिल्यादां तो शिवाजीला मारायला गेला असता योगिताने आपली साडी आणि ब्लाऊज सावरत त्याला त्याच्या तावडीतून सोडवून घेतले. त्या दोघांनी त्याला मारहाण करीत बेडवर ढकले. योगिताने त्याचे हातपाय घट्ट धरले. त्याच्या मांडीवर बसून प्रियकर शिवाजी याला त्याला मारून टाक, त्याचा गळा जोरात दाबून धर, त्याला सोडू नकोस असे म्हटले. त्या सरशी शिवाजीने सिध्देश्वर भिसे याचा गळा जोरात आवळून धरला. त्यांनी त्याला जरा ही हालण्याची आणि ओरडण्याची संधी दिली नाही. काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले सिध्देश्वर याचा गळा जोरात आवळून धरल्याने त्याचा श्वासो श्वास कोंडला गेला. त्याची हालचाल मंदावली. तसा तो शांत झाला. जागेलाच त्याचा मृत्यु झाला होता. योगिता आणि शिवाजी हे दोघे ही घामाघुम झाले होते. ते ही सावरले होते. एकदाचे आपण सुटलो म्हणत दोघांनी ही आपआपला घाम पुसला. त्याचा मृतदेह त्यांनी तसाच बेडवर पडू दिला. बेडच्या बाजुला त्यांनी शरीर सुखाचा मस्त पैकी सुख घेतले.त्याने तिला तिच्या नवऱ्याच्या डेडबॉडी जवळच पुर्णपणे नागडी करीत चांगले ठोकून काढले. तिने ही त्याला पाहिजे तसे शरीरसुख देत आपण ही ते सुख ओरबडून घेतले. दोघांचा तो कार्यक्रम मस्तपैकी झाल्यावर पहाटेच्या सुमारास त्यांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार केला.त्यासाठी योगिताने प्लास्टिकचे पोते शोधले. त्या पोत्यात त्यांनी सिध्देश्वर याचा मृतदेह पाय दुमडून कोंबला. रात्री दोनच्या दरम्यान त्या दोघांनी त्याचा मृतदेह घराबाहेर काढला. पोत्यावर एक कापड झाकले. त्याचा मृतदेह शिवाजीच्या दुचाकीवर पाठीमागे ती घेऊन बसली. त्या दुचाकीने ते दोघे भोर मार्ग सातारा जिल्याच्या सीमेजवळील सारोळा येथील नानाची वाडी हॉटेलच्या मागील बाजूस असणाऱ्या नीरा नदीच्या पात्रात सिध्देश्वर याचा मृतदेह नीर नदीच्या पात्रात टाकला आणि तेथून त्यांनी पोबरा पोबारा गेला. इकडे दोन दिवसांनी म्हणजे ५ मार्च रोजी योगिता भिसे हिने पुणे ग्रामीण पोलीस स्टेशन गाठून नवरा सिध्देश्वर भिसे हा दि.३ मार्च पासून कामावर जातो असे सांगून घरातून बाहेर गेला आहे तो अदयाप घराकडे परतला नाही तो बेपत्ता झाला असल्याची तक्रार तिने पोलीसात नोदविली. पुणे ग्रामीण पोलीस या घटनेचा तपास करीत असताना राजगड पोलीसांनी दि.९ मार्च रोजी सारोळा येथील सातारा जिल्हयातील सीमेजवळील नीरा नदीच्या पात्रात एका तरूणाचा मृतदेह प्लास्टिकच्या पोत्यात कोंबून नदी पात्रात टाकला असल्याची माहिती मिळाली. या घटनेची माहिती राजगड पोलीसांना माहिती मिळताच त्यांनी त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत या घटनेची माहिती घेऊन ग्रामस्थांच्या मदतीने पोत्यासह मृतदेह बाहेर काढला. मृतदेह कुजत चालला असल्याने त्याचा वास सुटला होता. मृतदेहाच्या उजव्या हातावर ओम असे गोदलेले होते. तर शर्टाच्या कॉलवर पाठीमागील बाजुस हडपसर येथील एका टेलरचे दुकानाचे नाव होते. या व्यतरिक्त मृतदेहाची ओळख पटविणारी कोणतीही दुसरी वस्तु नव्हती. पोलीसांनी घटनेचा आणि मृतदेहाचा पंचनामा करून या घटनेची माहिती वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांना दिली. वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून या घटनेच्या तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना दिल्या. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना राजगड पोलीसांना पुणे ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये नीरा नदीच सापडलेल्या तरूणाच्या मृतदेहाशी साम्य असलेला तरूण बेपत्ता असल्याची माहिती मिळाली.राजगड पोलीसांनी या माहितीवरून बेपत्ता असलेल्या तरूणाच्या पत्नीला घटनास्थळी बोलावून घेतले. तिने घटनास्थळी येवून सदर मयत तरूण हा तिचा बेपत्ता नवरा सिध्देश्वर भिसे असल्याचे तिने पोलीसांना सांगितले. मृतदेहाची ओळख पटल्यावर पोलीसांनी मृतदेह शवविच्छदनासाठी सरकार रूग्णालयात पाठवून दिला. राजगड पोलीस या घटनेची माहिती योगिता भिसे हिच्याकडून घेत असताना ती पोलीसापासून काही तरी लपवित आहे याची शंका पोलीसांना येत होती. तसेच तिच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती आढळून येत होती. म्हणून पोलीसांनी तिचा घटनेच्या दिवशीचा मोबाईल चेक केला असता तिच्या मोबाईलवर शिवाजी सुतार याचे कॉल आल्याचे दिसत होते. गुप्त बातमीदाराने पोलीसांना योगिता भिसे विषयी माहिती दिलेली होती की, तिचे शिवाजी सुतार याच्याबरोबर विवाह बाहय अनैतिक संबंध असून त्याच्या त्या संबंधाला सिध्देश्वर भिसे याचा विरोध होता. म्हणून दोघांनी मिळून सिध्देश्वर भिसे याचा गळा आवळून खून करून त्याचा मृतदेह दुचाकी गाडीवरून आणून सारोळा येथील नीरा नदीच्या पात्रात टाकला आहे. या माहितीवरून महिला पोलीसाकडून योगिता हिला बोलते केले असता तिने आपला गुन्हा कबुल करून प्रियकर शिवाजी सुतार याचे नाव पोलीसांना सांगून त्या दोघांनीच सिध्देश्वर याचा खून केला असल्याचे सांगितले. तिने सांगितलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील शिवाजी सुतार याला देखील ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. या दोघांनी गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत सिध्देश्वर भिसे याच्या नातेवाईका कडून घेतली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी सिध्देश्वर भीसे (३५) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याची पत्नी योगिता भिसे (३०) तिचा प्रियकर शिवाजी सुतार याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. या दोघांना ही पोलीसांनी कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापलेली मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा पुढील तपास राजगड पोलीस करीत आहेत. विवाहबाहय संबंधात बाई अडकली की ती नवऱ्याचा विचार करीत नाही, तिला फक्त तिचा प्रियकरचा ठोक्या म्हणून पाहिजे असतो त्यासाठी ती काही ही करायला तयार होते हेच या घटनेवरून दिसून येते.

17 TO 23 MARCH 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 3/15/2025 8:26 PM Page 1



# खानापूर येथे हरभऱ्याची बनिम जाळली; १ लाख २० हजारांचे नुकसान

**अहमदपूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील खानापूर येथे येथील शेतकरी शिवानंद विठ्ठल देशपांडे यांचे शेत शिवार गट क्रमांक ८५ मध्ये तीन हेक्टर ४८ आर जमीन असून या जमिनीमध्ये सदर शेतीमध्ये चार बॅग हरभरा पेरला होता हा हरभरा गोळा करून या हरभऱ्याची मोठी बनिम या शेतकऱ्याने शेतात लावून ठेवलेली होती. सदर हरभऱ्याची बनिम तिघा जणांनी संगणमत करून जाळली असून यात शेतकऱ्याचे १ लाख २० हजाराचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी किनगाव पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की अहमदपूर तालुक्यातील खानापूर येथे शिवानंद विठ्ठल देशपांडे यांची शेती असून सदर शेती भागीन व्यंकटी खांडेकर हे करतात.खानापूर शिवारातील गट क्रमांक ८५ मध्ये ३ हेक्टर ४८ आर जमिनीत शेतकऱ्याने हरभऱ्याच्या चार बॅगा पेरलेल्या होत्या दरम्यान हरभरा वाळला असता सदर हरभरा काढून त्याची शेतातच बनिम तयार करून शेतात शेतकऱ्यांनी ठेवली होती दरम्यान २८ फेब्रुवारी मध्येरात्री सदर हरभऱ्याची बनीबनिम जाळली असून यामध्ये १ लाख २० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. दरम्यान शिवानंद विठ्ठल देशपांडे यांनी सदर बनिम आजूबाजूच्या शेतकरी दत्ता खांडेकर यांचे चुलते सखाराम खांडेकर यांना विचारपूस केली मात्र माहिती मिळू न शकल्याने दिनांक १ मार्च रोजी किनगाव पोलीस ठाण्यास ची माहिती देऊन दोन मार्च रोजी सकाळी अंदाजे दहा वाजण्याच्या दरम्यान तलाठी संतराम वैद्य यांनी सदर जळालेल्या हरभऱ्याच्या बनिमेचा पंचनामा केला. तसेच शिवानंद देशपांडे हे खानापूर गावातील दूध डेरीपाशी थांबलेले असताना गावातीलच कोंडीराम देविदास शिंदे, कालिदास कोंडीराम शिंदे व राजकुमार साहेबराव शिंदे हे तिघे येऊन आम्ही तुझी पूर्वी सोयाबीनची बनिम जाळलो होतो त्याच काही झाले नाही. आता हरभऱ्याची बनिम जाळली आहे. आता काय होणार म्हणून शिवानंद देशपांडे यांच्याकडे पाहून हसू लागले त्यामुळे सदर हरभऱ्याची बनिम यांनीच जाळल्याचे देशपांडे यांच्या लक्षात आले त्यामुळे कोंडीराम देविदास शिंदे, कालिदास कोंडीबा शिंदे, राजकुमार साहेबराव शिंदे सर्व राहणार खानापूर तालुका अहमदपूर यांनी बनिम जाळून १ लाख २० हजार रुपयाचे नुकसान केले आहे. याप्रकरणी किनगाव पोलीस ठाण्यात तिघाजणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास किनगाव पोलीस करत आहेत.

# दोन चिमुकल्यांसह आईची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील वांगी येथे आईने दोन लहान चिमुकल्यसह विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्येचे कारण अजून समजू शकले नाही. ही दुर्दैवी घटना बुधवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली. चित्रा बाबासाहेब हक्के (२८), पृथ्वीराज बाबासाहेब हक्के (५) आणि स्वराज्य बाबासाहेब हाके (२) अशी विहिरीतील पाण्यात बुडून मरण पावलेल्यांची नावे आहेत. चित्रा हक्के या गावापासून जवळच असलेल्या त्यांच्या शेतातील वस्तीवर राहण्यास आहेत. बुधवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास त्या दोन्ही मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या बराच वेळ त्या मुलांना घेऊन घराकडे परतल्या नसल्याने नातेवाईक त्यांचा शोध घेत होते, परंतु त्या कोठे गेल्या हे समजू शकले नाहीत. दरम्यान सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास शेतातील वस्तीच्या जवळच असलेल्या विहिरीत एका व्यक्तीला महिला पाण्यावर तरंगताना दिसले. त्या व्यक्तीने तातडीने ही बाब वस्तीवरील



व गावातील लोकांना सांगितले. पाहता पाहता काही वेळातच लोकांची मोठी गर्दीत जमली त्यातील लोकांना तसेच नातेवाईकांना तो मृतदेह चित्रा हक्के यांचा असल्याचे लक्षात आले. विहीर अरुंद आणि खोल असल्याने विहिरीत उतरणे लोकांना अडचणीचे ठरत होते. त्यामुळे सोलापुरातील अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले.अग्निशामक दलाच्या जवानांनी विहिरीतील पाण्यातून चित्रा व दोन वर्षाचे बालक स्वराज्य या दोघांना बाहेर काढले रात्री उशिरापर्यंत पृथ्वीराज याला बाहेर काढण्याचे काम सुरू होते. याबाबत सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

# ठाण्यात १५ लाखांच्या लाचेप्रकरणी जीएसटी उपायुक्तांवर गुन्हा दाखल!

## एकजण ताब्यात तर उपायुक्तांचा शोध सुरू

**पालघर/प्रतिनिधी**




पालघर येथील एका व्यवसायिकाला वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) दंड कमी करुन देण्यासाठी त्यांच्याकडून १५ लाख रुपयांची मागणी केल्याप्रकरणी जीएसटी विभागाचे उपायुक्त तात्यासाहेब ढेरे आणि एका खासगी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. खासगी व्यक्तीला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक (एसीबी) विभागाने ताब्यात घेतले आहे. तर ढेरे यांचा शोध सुरू आहे. पालघर येथे ५२ वर्षीय व्यवसायिकाची कंपनी आहे. त्यांच्या कंपनीमध्ये उत्पादित केलेल्या वस्तूंच्या खरेदी विक्री बाबत त्यांना दंडासह वस्तू आणि सेवा कर आकारण्यात आली होती. ही रक्कम कमी करुन देण्यासाठी एकनाथ पेडणेकर या खासगी व्यक्तीने उपायुक्त तात्यासाहेब ढेरे यांच्यासाठी १५ लाख रुपयांची मागणी व्यवसायिकाकडे केली होती. याप्रकरणी २८ फेब्रुवारीला व्यवसायिकाने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. रविवारी पेडणेकर याने व्यवसायिकाला १५ लाख रुपये घेऊन अंधेरी येथील चीमतपाडा येथील एका उपाहारगृहात बोलावले. त्यानुसार, ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याठिकाणी सापळा रचला. तेथे १५ लाख रुपयांची लाच घेताना पेडणेकर याला पथकाने ताब्यात घेतले. तर ढेरे यांचा पोलीस पथकाकडून शोध शुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

# वसईत बविआ आयोजित महिला दिनानिमित्त कार्यक्रमात सहा कर्तृत्वान महिलांचा सन्मान!



**विरार/प्रतिनिधी**

नाच, गाणी, किस्से आणि उखाणे याने काल माणिकपूर येथील वायएमसी सभागृह दणाणून गेले होते. निमित्त होते ते बहुजन विकास आघाडी- नवघर माणिकपूर यांनी आयोजित केलेल्या महिला दिनाच्या कार्यक्रमाचे. कार्यक्रमाची सुरुवात माजी महापौर नारायण मानकर, संदेश जाधव, सत्कारमुर्ती चंदा वनमाळी, स्वरा पाटील, नम्रता मुळे, विशाखा गाळवणकर,ालिव्हिया गोन्सालविस यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सुरूवात झाली. या कार्यक्रमात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या पोलीस उपायुक्त पौर्णिमा शृंगी, लहान वयात एव्हरेस्ट सर करणारी स्वरा पाटील, पुस्तक प्रकाशन व्यवसायात ५० वर्ष पूर्ण केलेल्या डिम्पल प्रकाशनच्या नम्रता मुळे, पर्यावरणावर विषयावर पीएचडी मिळविणाऱ्या ालिव्हीया गोन्सालवीस, कवियित्री साहित्यिका विशाखा गाळवणकर, अदानी कंपनीच्या उपाध्यक्षा चंदा वनमाळी यांचा सत्कार पौर्णिमा श्रृंगी यांचे हस्ते करण्यात आला. चंदा वनमाळी व पौर्णिमा श्रृंगी यांनी महिलांना उत्तम मार्गदर्शन केले. यावेळी नक्षत्र ग्रुपचे जोगवा नृत्य आणि सूर्यप्रकाश मुडापाट यांच्या विद्यार्थ्यांनी कराटे प्रत्याक्षिक, विशाल डान्स ग्रुप कोळी नृत्य सादरिकरण केले त्यानंतर चल गो बाय करूया धमाल या कार्यक्रमात निवेदक कुणाल रेगे आणि स्वाती जोशी यांनी महिलांना अनेक किस्से सांगितले. गायक जयंत पिंगुळकर, अमृता दहिवलकर यांच्या गाण्यांवर महिलांनी चांगलाच ठेका धरला होता. आणि मग सुरु झाली ती मस्ती आणि धमाल कार्यक्रमाला महिलांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी प्रकाश वनमाळी, वृंदेश पाटील, कल्पेश मानकर, मनिषा जाधव, पुष्पा जाधव मा.नगरसेविका उपस्थित होत्या.

# भिवंडीत जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; १३ जणांवर गुन्हा दाखल




**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील मध्यवर्ती भागातील अजय नगर परिसरात गुन्हे शाखा घटक-२ च्या पोलिस पथकाने धाड टाकून मटका नावाचा जुगार खेळणाऱ्या १३ जणांच्या विरोधात कारवाई करून सर्वांवर निजामपूरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जुगार रायटर राजु बाळा जोगदंड, सुमेध सदाशिव इंगळे, प्रविण विठ्ठल शिंदे यांच्यासह रमेश कुज्जू स्वामी, श्रीनिवास संतोष पेदीराम, साबुद्दीन जैबुद्दीन अंसारी, अब्दुल ताहीर लतीफ खान, पापा जिशान नजीरअली अंसारी, राजु चंद्रया पुली, मृत्युंजय मटरूप्रसाद यादव, महादेव बळी कांबळे, किशोर भास्कर भालेराव,आनंद नायडु अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. जुगाऱ्यांनी स्वतःच्या फायद्याकरिता अजय नगर परिसरातील खाडीपार रोडवरील समीर सर्व्हिस सेंटरच्या पाठीमागे ११ मार्च रोजी जुगार अड्ड्यावर लोकांकडून पैसे स्वीकारून आकडे लिहून मटका नावाचा जुगार खेळताना व खेळवत असतानाच गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने धाड टाकून जुगाऱ्यांकडून ११ हजार ३१० रुपये किमतीचा जुगार साहित्य जप्त केला असून सर्वांच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात गुन्हे शाखेचे पोह राजेश शहाजी गावडे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोना सोनवणे करीत आहेत.

# मिरा-भाईंदर न्यायालयात पहिल्यांदाच ऑर्डर ऑर्डर!

मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर न्यायालय सुरू झाले असून त्याचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते सुरू झाल्यानंतर न्यायालयाचे कामकाज सुरू झाले आहे. त्या न्यायालयात एस.एस.जाधव दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मिरा-भाईंदर हे कामकाज बघत आहेत. त्यात प्रथमच भाईंदर पोलीस ठाण्यात गौवंश तस्करीच्या गुन्ह्यात दोन आरोपींना न्यायालयाने ५० हजार रुपये वैयक्तिक दायित्व भरून दोन्ही आरोपींना जामीन मंजूर केला आहे. यामुळे मिरा भाईंदर मध्ये 'ऑर्डर - ऑर्डर' सुरू झाली आहे. नवीन न्यायालयामुळे नागरिकांची ठाणे न्यायालय येथे जाण्याची पायपीट थांबणार आहे. सदरील गुन्हा हा तीन महिने शिक्षेचा असल्याने ५० हजार वैयक्तिक दायित्व करण्याचे आदेश देत जामीन दिला आहे. आरोपी तर्फे कामकाज वकील राजदेव पाल, वकिल कणई बिश्वास, वकील अमित पांडे व वकील रवी श्रीवास्तव यांनी पाहिले आहे.

# शासनाच्या सूचनेनुसार वसई-विरार पालिकेची क्षयरोग प्रतिबंधक मोहीम युद्धपातळीवर सुरू

**विरार/प्रतिनिधी**

शासनाने दिलेल्या सूचनेनुसार सक्रिय क्षयरोग तपासणी मोहिमेअंतर्गत प्रशिक्षित पथके घरोघरी जाऊन संशयित क्षयरुग्णांची ओळख पटवणार आहेत. १० मार्च ते २२ मार्च या कालावधीत राज्यातील सर्व जिल्हे व नगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सक्रिय क्षयरोग तपासणी मोहीम राबविण्याच्या सूचना आरोग्य विभागामार्फत जारी करण्यात आल्या आहेत. या मोहिमेचा उद्देश नवीन क्षयरुग्ण शोधणे हा आहे कारण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांची नोंदणी काही काळापासून रखडलेली आहे किंवा कमी आहे.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या औद्योगिक परिसरात मोहीम राबविण्यात येत आहे. वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात १० दिवस सक्रिय क्षयरोग तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक सदस्याला सदर मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी व अपेक्षित उद्दिष्टाची पूर्ण अंमलबजावणी होण्यासाठी वैद्यकीय अधिकारी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र डॉ.भक्ती चौधरी व शहर क्षयरोग अधिकारी डॉ.राजेश चौहान यांनी मार्गदर्शन केले आहे. तथापि, औद्योगिक क्षेत्र समन्वयकाने भेट देणाऱ्या संघांना मदत करावी. त्यामुळे आरोग्य विभागाला अभियानाचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल, तसेच वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात १० दिवस सक्रिय क्षयरोग तपासणी मोहीमेला सहकार्य करावे असे आवाहन वसई-विरार शहर महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी केले आहे.

# वसईतील समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम मोहिमेंतर्गत पालिकेला आंतरराष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नामांकन



**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार शहर महानगरपालिकेला समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम मोहिमेंतर्गत आंतरराष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नामांकन करण्यात आले आहे. १३ किनारी राज्यांमध्ये राज्य सरकार स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम मोहिम हाती घेण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त उपक्रम मोहिम २१ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्याचे पर्यावरण व हवामान बदल विभाग, राज्य शासन यांनी निर्देश दिले होते. राष्ट्रीय किनारपट्टी कचरामुक्त करण्यासाठी प्रोत्साहित करणे, जागतिक महासागर आणि जलमार्गांचे जतन व संरक्षण करण्याबद्दल लोंकामध्ये जागृकता निर्माण करणे हे हा दिवस साजरा करण्याचा मुळ उद्देश होता. त्या अनुषंगाने वसई विरार पालिकेने दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी विरार पूर्वेकडील राजोडी बिच येथे आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय कोस्टल क्लीनअप दिवस (ICCD) गो-शुन्य प्रा. लि. यांच्या सहयोगाने स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

सदर मोहिमे अंतर्गत शहरातील स्वयंसेवक, शाळा, महाविद्यालये, NCC व NSS विद्यार्थी, महिला बचतगट, लोकप्रतिनिधी, पत्रकार वर्ग, सामान्य नागरीक, तसेच महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी एकुण १५ हजार हून अधिक सहभागी उपस्थित होते. एकुण ५३ मेट्रिक टन कचरा संकलन करून त्यातील ६६२ कि.ग्र. प्लास्टिक कचर्याचे रिसायकल प्रात्याक्षिक (Demonstration) नागरीकांना दाखविण्यात आले. दरम्यान आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड बुकमध्ये सर्वात जास्त स्वयंसेवकांचा सहभाग सर्वोच्च कचरा संकलन तसेच प्लास्टिक कचऱ्याचे Live Recycling या तीन श्रेणीमध्ये मानांकन प्राप्त झाले आहे, असे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले, तर समुद्र किनाऱ्याचे सौंदर्य अबाधित ठेऊन, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी महापालिकेने सुरू केलेली ही मोहिम, केवळ आजची आवश्यकता नाही, तर आगामी पिढ्यांसाठी त्याचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. महापालिका, स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून मोहिमेमध्ये सहभागी होणाऱ्यांच्या मदतीने समुद्र किनार्यांच्या प्रदूषणाला नियंत्रित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे, असे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

# विक्रमगड - मनोर रस्त्यावर भोपोली गावच्या हद्दीत अपघातात तरुणीचा मृत्यू

पालघर : विक्रमगड- मनोर रस्त्यावर भोपोली गावच्या हद्दीत शनिवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास दुचाकी झाडाला धडकून झालेल्या अपघातात एका तरुणीचा मृत्यू झाला. तर दुचाकी चालक गंभीर जखमी झाला आहे. आरती नरेश बसवत (२०) असे मयत तरुणीचे नाव असून ती पालघर तालुक्यातील वसरोली गावाची रहिवाशी होती. दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शनिवारी रात्री आकाश प्रकाश तांडेल हा आरती बसवतसह त्याच्या दुचाकीवरून विक्रमगड तालुक्यातील तलावली येथून विक्रमगड-मनोर रस्त्यामार्गे दुर्वेस येथे जात होता. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास भोपोली गावाच्या हद्दीत भरधाव वेगात असताना त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला धडकून अपघात झाला. यावेळी आरती बसवत हिचा मृत्यू झाला. तर दुचाकी चालक आकाश तांडेल गंभीर जखमी झाला होता.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक १८७ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत कंत्राटदार** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. १७/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ सकाळी ११.०० ते संध्या. ४.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०५ (पाच) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | पावन चिंचपाडा रस्त्यावर साकव बांधणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१२८८९/- | ४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती (४२२५ १५५७) ५३ |
| २. | गांगोडी पाटीलपाडा रस्त्यावर साकव बांधणे. ता.डहाणू, जि.पालघर | रु. ८०१२०४/- | ४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती (४२२५ १५५७) ५३ |
| ३. | बापुगाव वळवीपाडा रस्त्यावर साकव बांधणे. ता.डहाणू, जि. पालघर | रु. ८१५८४६/- | ४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती (४२२५ १५५७) ५३ |
| ४. | सायवन पिंपळपाडा रस्त्यावर साकव बांधणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२२८३८/- | ४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती (४२२५ १५५७) ५३ |
| ५. | पोलीस स्टेशन वाणगाव येथे गोपनिय कक्षाची सुधारणा करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२३५५२/- | २२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती (२२२५ई ४०९) २७ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरील कामाची निविदा उपलब्ध कालावधी - दि. १७/०३/२०२५ ते दि. २४/०३/२०२५ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. २७/०३/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२१६९**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

सा.बां. विभाग, पालघर

बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,

पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.

दिनांक : ०६/०३/२०२५

**सही/-**

**(नि.भोये)**

कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**जिमाका/पालघर/जाहि २७४/१५५/२०२५ दिनांक : १०/०३/२०२५**

17 TO 23 MARCH 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 3/15/2025 8:26 PM Page 1



# श्रद्धेचा बाजार आणि भाविकांची लूट!

देवावर श्रद्धा असायलाच हवी. त्यामुळे माणसाला आत्मिक बळ मिळते. त्यासाठी माणूस नेहमी घरातून बाहेर पडताना देवाची पूजा करून बाहेर पडतो.ङ्ग तसेच वर्षातून किमान चार-पाच वेळा तरी धार्मिक स्थळांना भेट देऊन देवदर्शन करतो. ही माणसाची खरी खुशी श्रद्धा आहे. पण दुर्दैवाने लोकांच्या याच श्रद्धेचा काही लुटारुणी अक्षरशः बाजार मांडलेला आहे. आणि त्याचा प्रत्यय सर्व धार्मिक स्थळी बघायला मिळतो. अगदी तिरूपती पासून शिर्डीच्या साईबाबांपर्यंत. आणि कामाख्या देवी पासून शबरीमाला मंदिरापर्यंत जेवढी जेवढी मोठी धार्मिक स्थळे आहेत त्या सर्व ठिकाणी श्रद्धेचा अक्षरशा बाजार मानला जातो. भाविक त्या ठिकाणी देव दर्शनाला जातात. परंतु तिथले व्यापारी आणि देवदर्शन घडवून आणणारे काही दलाल अक्षरशः भाविकांना लुबाडतात. त्यांच्याकडून खंडणी प्रमाणे पैसा वसूल करतात. बरे याबाबत कोणी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला तर त्याला मारहाण करण्यापर्यंत या लुटारूंची मजल गेलेली असते. महाराष्ट्रापुरत बोलायचं झाल्यास महाराष्ट्रात सर्वाधिक गर्दी ही शिर्डीच्या साई मंदिरात होते. रोज देशभरातून हजारो भाविक शिर्डीला जातात. तसे पाहता पंढरपूरचा विठुराया, कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, मुंबईचा सिद्धिविनायक अशी काही मोठी धार्मिक स्थळे आहेत. तिथे लाखोंच्या संख्येने भाविक जातात. आणि देवदर्शन करतात. परंतु या भाविकांना तिथले जे अनुभव आहेत ते काही चांगले नाहीत. फुले,हार नारळ यासारख्या पूजेच्या सामानापासून ते दर्शनाच्या रांगेपर्यंत सर्व ठिकाणी भाविकांना लुबाडण्याचे काम केले जाते. दुर्दैवाने याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था मग ती ग्रामपंचायत असो की महानगरपालिका! अशा बाजार मांडून बसलेल्या लोकांना अजिबात प्रतिबंध करत नाही. किंवा पोलीस प्रशासनही अशा लोकावर कारवाई करीत नाहीत. त्यामुळे धार्मिक स्थळी दुकाने मांडून बसलेले लोक अक्षरशा लुटारू बनले आहेत. राज्य सरकार समोर हा प्रश्न अनेक वेळा आला, परंतु ही धार्मिक बाब असल्यामुळे राज्य सरकार सुद्धा धार्मिक स्थळांवरच्या लुटारूंवर कारवाई करायला टाळाटाळ करते. पण त्यामुळे चिऱ्या भाविकांची लूटमार होते. हे सर्व एवढ्यासाठीच सांगायचे आहे की, गेल्या आठवड्यात शिर्डीमध्ये भाविकांची लूट करणाऱ्या तीन दुकानांना शिर्डी नगरपालिकेने सील केले. विशेष म्हणजे या कारवाईबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी असलेले महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या कारवाईचे समर्थन केले आहे. राधाकृष्ण विखे पाटलांना खूप उशिरा जाग आली म्हणायला हरकत नाही. वास्तविक इतके वर्ष ते शिर्डीतून निवडून येत आहेत. त्यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन शिर्डी मध्ये भाविकांची होणारी लूट थांबवण्याचा प्रयत्न करायला हवा होता. परंतु आत्तापर्यत त्यांनी तसे केले नाही आणि आता नगरपालिकेने कारवाई केल्यावर या कारवाईचे त्यांनी हळू आवाजात समर्थन केले. शिर्डीमध्ये जाणाऱ्या भाविकाला कोण कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते याची संपूर्ण माहिती पालिका प्रशासन आणि पोलिसांना आहे. परंतु तक्रार कोणाकडे करणार? शिर्डीमध्ये साई संस्थांची काही स्टॉल आहेत परंतु त्यापेक्षा दुपटीने बेकायदेशीर स्टॉल आहेत. अर्थात धार्मिक स्थळा जवळ पूजा विधीचे सामान विक्रीचा व्यवसाय करण्याची स्थानिकांना मुभा आहे .त्यांना तशी संधी मिळायला हवी. कारण शेवटी त्यांच्या रोजगाराचा प्रश्न आहे. अर्थात धंदा करायला काय हरकत नाही .पण आम्ही स्थानिक आहोत त्यामुळे आम्ही या ठिकाणी काहीही करू शकतो ही भावना त्यांच्या मनात असता नये. शिर्डीमध्ये मंदिराच्या आसपास जे स्टॉल लावलेले आहेत त्या स्टॉलवर पूजेचे साहित्य इतके महागड्या किमतीत मिळते की सर्वसामान्य माणसाला इच्छा असूनही ते घेता येत नाही. त्याचबरोबर मंदिराच्या आसपास जी उपहारगृह आहेत त्या ठिकाणीही अत्यंत महागड्या किमतीत खाद्यपदार्थ विकले जातात. रिक्षा वाल्यांबद्दल बोलायलाच नको. मनमानी भाड्या आकारणे हा तर जणू त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे! तर शिर्डी मध्ये जे लॉज आहेत त्यांची भाडेही अवाच्या सव्वा आहेत. त्यामुळे या ठिकाणी दर्शनासाठी येणारे भावीक अत्यंत त्रस्त झालेल्या असतात. थोडक्यात सांगायचे म्हणजे शिर्डीत श्रद्धेचा बाजार मांडणाऱ्या व्यापाऱ्यांनी भाविकांची अक्षरशः लुटमार केलेली आहे. तोच प्रकार पंढरपूर मध्ये बघायला मिळतो. पंढरपूर मध्ये ही मंदिराच्या आसपास पूजा साहित्य किंवा प्रसादाचे साहित्य विकणारी जे स्टॉल आहेत ते मनमानी किमतीत साहित्य विकतात. त्याबद्दल भाविकांनी तक्रार केल्यास त्याला मारायलाही कमी करीत नाहीत. तसेच विठुरायाचे लवकर दर्शन मिळवून देण्याची बतावणी करणारे काही दलाल सुद्धा पंढरपुरात सक्रिय आहेत. केवळ पंढरपुरातच नाही तर प्रत्येक धार्मिक स्थळी सक्रिय आहे. ते सुद्धा अक्षरशः लोकांची फसवणूक करतात. पंढरपुरातली उपाहारगृह असोत, लॉज असो, हॉटेल असो सर्व ठिकाणी आवाच्या सभा भाडी आकारली जातात. त्यामुळे लोकांनी देवदर्शन करायचे तरी कसे? तुळजापूर च्या मंदिरात तर त्याहीपेक्षा भयंकर स्थिती आहे. या ठिकाणी मंदिरात प्रवेश करण्यापूर्वीच काही दलाल भाविकांना गाठतात व त्यांच्याकडून ५०० ते ७०० रुपयांची मागणी करून जबरदस्तीने पूजा करायला लावतात. तर लवकर दर्शन हवे असल्यास दोनशे रुपये द्यावे लागते. त्याची वेगळी रांग आहे. शिवाय मंदिराच्या आसपास असलेल्या पूजेच्या साहित्याची दुकाने, प्रसादाची दुकाने, उपहारगृह यांच्याकडून आवाच्या सव्वा किमतीत पदार्थ विकले जातात ते वेगळेच! कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिराच्या परिसरात सुद्धा तोच प्रकार आहे. आता प्रश्न असा येतो की ही सगळी धार्मिक स्थळे नाही म्हटले तरी म्हणजे प्रशासनाला भरपूर निधी उपलब्ध करून देतात. कारण येणारे भाविक दर्शन पेटीत पैसे टाकल्याशिवाय पुढे जात नाही .शिवाय खाजगीरित्या मंदिराला देणग्या देणाऱ्यांची ही संख्या मोठी आहे. म्हणजे मंदिर प्रशासनाला एवढं सगळं उत्पन्न मिळत असताना इथे येणाऱ्या भाविकांना जो त्रास सहन करावा लागतो, त्यांची जी लुटमार केली जाते त्याकडे मंदिर प्रशासन लक्ष का देत नाही? या सर्व प्रकरणात मंदिर प्रशासन दोशी आहे. किंबहुना मंदिर प्रशासन आणि भाविकांची लूटमार करणारे धार्मिक स्थळांवरचे हे बाजार बाजारू लोक यांची यांचे लागेबांधे तर नाहीत ना! अशी एक शंका निर्माण होते. हा सगळा प्रकार पहिल्या नंतर देव दर्शनाला जायचे की नाही असाही प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होतो. शेवटी परमेश्वर जळी सळी काष्टी असतो. कुठल्याही देवाला नमस्कार केला तरी तो पावन होतो. त्यासाठी मोठ मोठ्या धार्मिक स्थळी जायलाच हवे अशातला काय भाग नाही. पण लोकांची श्रद्धा असते, की पंढरपूरला गेल्यावर आपली कामना पूर्ण होईल. किंवा तुळजाभवानीच्या मंदिरात नतमस्तक झाल्यास आपल्या अडीअडचणी दूर होतील. साईबाबांच्या चरणी डोकं ठेवल्यास आपल्या मनातले संकल्प पूर्ण होतील. ही जी भावना असते. त्या भावनेतून निर्माण झालेल्या श्रद्धेपोटी लोक धार्मिक स्थळांवर दर्शनासाठी जातात. पण दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची होणाऱ्या लुटणारी मुळे वाईट अवस्था होते. लोकांच्या मनातील धार्मिक श्रद्धा आणि देवावरचा विश्वास यांना कुठेतरी थोडाफार का होईना तडा जातो. लोक विचार करतात की तिथे जाऊन जर अशा प्रकारे आपले खिसे कापले जाणार असतील. तर इथूनच आपण देवाचे नाव घेतले तर काय बिघडले? अशा प्रकारची भावना जर प्रत्येक भाविकाच्या मनामध्ये निर्माण होऊ लागली तर धार्मिक स्थळांकडे तर ही सगळी धार्मिक स्थळे ओस पडतील. याची खबरदारी घेऊन धार्मिक स्थळ श्रद्धेचा बाजार मांडणाऱ्यांपासून मुक्त करण्याची आवश्यकता आहे.

# सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या शिक्षिका व कवयित्री!

आठ हजार वर्षे पूर्वी मातृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. महिला हीच कुटुंब प्रमुख असायची. महिलांनी शेतीचा शोध लावला, महिला शेती घर बांधने, वैद्यकीय बाबतीत अतिशय हुशार होत्या. परंतु ४००० वर्षांपूर्वी भारतात आर्यांचे आक्रमण झाले व त्यांनी भारतातील सर्व महिलांना पुरुष सत्ता कुटुंब पद्धती सुरू करून गुलाम केले. त्यांचे सर्व अधिकार रद्द केले व पुरुषाकडे सत्ता घेतली. भारतात इंग्रजानी शाळा सुरू करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनाही म्हणावे तेवढे यश आले नाही. पण ज्योतिबा फुले आणी सावित्रीबाई फुले नावाची तेजोमय पहाट झाली आणी देशात स्त्री शिक्षणा चळवळीचा उदय झाला. सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यात नेवासे पाटलाच्या घरात नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ ला झाला त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी लहानपणी झाला होता. त्या काळात महिलांची स्थिती अतिशय दयनीय होती कारण हजारो वर्षापासून भारतातील स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते, त्यांना शिक्षण नव्हते, कोणतेही अधिकार नव्हते, मनुस्मृतीने सर्व महिलांना व सर्व मागासवर्गीयांना ज्ञानापासून वंचित ठेवले होते. त्यांना कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. शिक्षण बंदी, रोटी बंदी, व्यवसाय बंदी, शस्त्र बंदी अशा अनेक कारणांनी महिला व मागासवर्गीयांची प्रगती होऊ शकली नाही. महात्मा फुले यांचे कुटुंब पुणे येथे राहण्यास आले. त्यांचे खरे आडनाव गोरे होते परंतु फुले विकण्याच्या व्यवसायामुळे त्यांना फुले असे आडनाव पडले. महात्मा फुले यांच्या आईचे नाव चिमणाबाई होते. त्या काळात महात्मा फुलेंचे वडील गोविंदराव यांनी ज्योतिबांना शाळेत टाकले परंतु उच्चवर्णीय नोकरामुळे त्यांनी ज्योतिबाला शाळेतून काढून घेतले. परंतु त्या काळात गफार बेग मुंशी यांनी गोविंदराव यांच्याशी सल्लामसलत करत ज्योतिबा फुले यांना शाळेत परत टाकण्यास सांगितले. त्यामुळे पुढील काळात ज्योतिबा मॅट्रिक समक्ष परीक्षा पास झाले. ज्योतिबा अभ्यासात फार हुशार होते त्या काळात काही मशिनरी शाळा व पंतजींच्या शाळा होत्या एकदा ते एका उच्चवर्णीय मित्राच्या लग्नात गेले असताना त्यांना वरातीतून बाजूला करण्यात आले. त्यामुळे त्यांना मोठा धक्का बसला. त्यामुळे त्यांनी वेद महाभारत धर्मशास्त्रे व इतिहास वाचला त्यांना असे कळाले की वर्णभेद व जातीभेद धर्मशास्त्रात लिहिली आहेत त्यामुळे त्यांनी धार्मिक ढोंग बाजीविरुद्ध लढा उभारला. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना महाराष्ट्राचा मार्टिन ल्युथर म्हणतात. महात्मा फुले यांना मुंबईच्या जनतेने कोळीवाड्यातील सभेत महात्मा ही पदवी दिली होती. त्यांनी अमेरिकेचा इतिहास वाचला व त्यांनी इंग्रजा विरुद्ध लढण्याचे ठरविले परंतु नंतर त्यांनी सामाजिक व धार्मिक विषमते विरुद्ध लढा उभारला त्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढून दिले. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांनी मागासवर्गीयासाठी पाण्याची विहीर खुली करून दिली. त्या काळात त्यांनी उच्चवर्णीय सहित सर्व समाजाच्या महिलांसाठी भिडे यांच्या वाड्यात इसवीसन १८४८ साली पहिली मुली साठी शाळा काढली व विशेष १८५१ला अनुसूचित जाती जातीच्या मुलासाठी शाळा सुरू केली. त्या काळात परांजपे गावंडे सारख्या मित्राने साथ दिली. त्या काळात सावित्री बाई फुले यांना स्वतः शिक्षण दिले तसेच सावित्रीबाई फुले यांना नगरच्या अमेरिकन मिशन शाळेत शिक्षकाच्या अभ्यासक्रमासाठी उस्ताद लहुजी साळवे यांच्यासोबत पाठवले. अशा तऱ्हेने त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका बनल्या त्या काळात धर्म मार्तंड आणि मुलीची शाळा सुरू केली. म्हणून त्यांना फार त्रास दिला त्यांच्यावर शेण फेकले, दगड मारले परंतु त्यांनी शिक्षणाचे कार्य सुरू ठेवले त्या काळात त्यांच्यामुळे फातिमा शेख ह्या त्यांच्या विद्यार्थिनी पहिल्या मुस्लिम शिक्षिका बनल्या. त्या काळात उस्ताद लहुजी साळवे यांनी त्यांना संरक्षण दिले त्यांची मातंग समाजाची विद्यार्थिनी मुक्ता साळवे हिने इसवी सन १८५५ साली निबंध लिहिला की मागासवर्गीयांचा धर्म कोणता हा निबंध त्या काळात फार गाजला व तो निबंध त्या काळात लंडनमध्ये पाठवण्यात आला होता. त्या काळात उच्चवर्णीय महिलांना लहानपणी वयस्करची लग्न झाल्यामुळे त्या लवकरच विधवा होत असे त्या काळात घरातील माणसे त्यांचे शोषण करीत असत त्यामुळे त्या गरोदर राहिल्यामुळे स्व हत्याकरीत असे किंवा लहान मुलांना दूर सोडून देत असे त्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी इसवी सन १८६० साली एक बालहत्या प्रतिबंध गृह काढले त्यांनी काशीबाई नातू या उच्चविणे विधवा महिलेला स्व हत्या करण्यापासून वाचविले व तिचा मुलगा यशवंत यास दत्तक घेतले तो पुढे डॉक्टर झाला



होता. त्याचा विवाह त्यांनी सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या मुलीशी लावून दिला. इसवी सन १८७३ ला महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्या काळात त्यांनी वर्णभेद जातीभेद डोंग बाजी अंधश्रद्धा सामाजिक आर्थिक विषमता याच्या विरुद्ध लढा दिला सावित्रीबाई फुले यांनी खूप वाचन केले होते त्या काळात त्यांनी इसवी सन १८५२ साली इंग्रज सरकारने मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा विश्रामबागेतील वाड्यात सत्कार केला. सावित्रीबाई फुले यांच्या शाळेचा दर्जा व निकाल फार चांगला होता. त्या काळात इसवी सन १८७६ मध्ये फार मोठा दुष्काळ पडला होता. त्या काळात त्यांनी अन्नछत्रे चालवली त्या काळात इसवीसन १८५४ मध्ये सावित्री माता फुले यांनी काव्य फुले नावाचा कविता संग्रह लिहिला होता .त्या उत्कृष्ट कवयित्री होत्या. त्या काळात उच्चवर्णीय विधवा महिलांना केसवपन करण्यात येत होते. त्या काळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी नाभिक मंडळींना सांगून ही प्रताप बंद करण्याचे आंदोलन केले व ही बातमी त्या काळात लंडनच्या वर्तमानपत्रात आली होती व तेथील महिलांनी त्याबद्दल अभिनंदन केले होते. त्या काळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी इसवी सन १८६९ साली छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी रायगडला शोधली व प्रथम शिवजयंती साजरी केली.महात्मा ज्योतिबा फुले यांनी हंटर कमिशन पुढे सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून साक्ष दिली. तसेच तृतीय रत्न या नाटकाद्वारे सर्वप्रथम आरक्षणाची मागणी केली. त्या काळात सत्यशोधक चळवळीमध्ये सर्व समाजाचे लोक सामील झाले होते. इसवी सन १८९३ साली सासवड येथे झालेल्या सत्यशोधक समाजाच्या वर्धापन दिनाच्या सावित्रीबाई ह्या अध्यक्ष होत्या. इसवी सन १८८८ सालापासून महात्मा ज्योतिबा फुले यांना अर्धांग वायूचा त्रास होता. त्यांच्या उजव्या हाताने लेखन होत नव्हते. त्या काळात सावित्रीबाईनी ज्योतिबा फुले यांची फार सेवा केली त्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या त्या काळात येणाऱ्या जाणाऱ्यांची कार्यकर्त्यांची काळजी घेत असत. सन १८९७ साली भारतात प्लेगची साथ आली होती. त्या काळात हजारो लोक मरत होते. त्या काळात त्यांनी त्यांचा दत्तक मुलगा डॉक्टर यशवंत याला घेऊन जनतेची खूप सेवा केली. व त्यांनी एका गायकवाड नावाच्या मागासवर्गीय मुलाला खांद्यावर नेऊन वाचविले. परंतु प्लेगमुळेच त्यांचे दहा मार्च १८९७ ला दुःखद निधन झाले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी गुलामगिरी व शेतकऱ्यांचा आसूड हे ग्रंथ लिहिले. धार्मिक सामाजिक आर्थिक गुलामगिरी विरुद्ध लढा दिला त्यांच्या महान कार्यात सावित्रीबाई फुले यांनी साथ दिली. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळेच व त्यागामुळे भारतातील महिला प्रगती कडे जात आहेत. त्यांच्यामुळे सर्व समाजांच्या महिला व पुरुष डॉक्टर, वकील, न्यायाधीश, पायलट, इंजिनियर, प्राध्यापक झालेले आहेत. त्यांच्याच कार्याला छत्रपती शाहू महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, गाडगे महाराज, डॉक्टर पंजाबरावजी देशमुख यांनी पुढे चालवली आहे, मात्र आज ही काही महिला अंधश्रद्धा सामाजिक विषमता मानतात त्यामुळे आता महिलांनी जागृत होणे विज्ञानवाद व समतावाद मानने गरजेचे आहे. सर्वांनी तसेच सर्व महिलांनी राष्ट्रमाता जिजामाता, अहिल्या माता होळकर, सावित्रीबाई फुले व रमाबाई आंबेडकर आणि ताराबाई शिंदे यांचा आदर्श ठेवला पाहिजे. आज आपण पाहतो प्रत्येक शाळेमध्ये किंवा कार्यक्रमात शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांचा फोटो लावत नाहीत परंतु ती शिक्षणाची खरी जननी सावित्रीबाई फुले आहे म्हणून त्यांच्या या त्यागाला कार्याला आपण आदरांजली राहिली पाहिजे. अशा या शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या स्मृती दिनी क्राईम संध्यापरिवारातर्फे आदरांजली.

**– प्राचार्य शंकर सोनवणे**

# राज्यात साडेतीन कोटी आयुष्यमान कार्ड काढण्याचे उद्दिष्ट –मंत्री प्रकाश अबिटकर

**पालघर/प्रतिनिधी**

१३०० आजारांवर उपचार करण्यास सर्वसामान्य नागरिकांना लाभदायी ठरणारे महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य कार्ड राज्यातील अनेक नागरिकांकडे असले तरी १९०० आजारांवर विनामूल्य उपचार देणारे आयुष्यमान कार्ड राज्यातील फक्त २७-२८ हजार नागरिकांकडे उपलब्ध आहे. येत्या काही महिन्यात आयुष्यमान कार्ड धारकांची राज्यातील संख्या साडेतीन कोटी पर्यंत नेण्यासाठी मिशन मोडवर काम हाती घेण्यात आले असून त्यामुळे अनेक नागरिकांना विविध आरोग्य विषयी लाभ सहजगत मिळतील असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबिटकर यांनी पालघर येथे प्रतिपादन केले. राज्यात येत्या महिन्याभरात १०८ प्रणाली अंतर्गत १७०० सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध होतील अशी ही माहिती त्यांनी दिली. देशभरात सर्व ठिकाणी उपयुक्त ठरणारे आयुष्यमान कार्ड काढण्यास नागरिकांनी आळस केल्याने अशा कार्डधारकांची संख्या राज्यात २८ लाखांपेक्षा कमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांमध्ये राबविण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमात आयुष्यमान कार्डधारकांची संख्या साडेतीन कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असून आरोग्य यंत्रणा तसेच इतर विभागाच मदतीने हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मिशन मोडवर काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. सन २०१४ मध्ये राज्य सरकारने करारनामा करून १०८ प्रणालीच्या रुग्णवाहिका सेवा सुरू केली. या कराराला १० वर्षांचा कालावधी उलटला असून रुग्णवाहिकांची स्थिती खालावली असून त्यामुळे सेवेच्या दर्जावर परिणाम झाल्याचे आरोग्यमंत्री यांनी सांगितले. जून २०२३ मध्ये राज्य सरकार बरोबर करण्यात आलेल्या नवीन करारनामा मध्ये सध्या असलेल्या ९५७ रुग्णवाहिकांऐवजी १७०० सुसज्ज रुग्णवाहिका घेण्याची तरतूद करण्यात आली असून निवडणुकीदरम्यान असणारी आचारसंहिता व इतर तांत्रिक कारणांमुळे हा प्रस्ताव रखडला होता. सुमारे ६०० कोटी रुपयांच्या या प्रस्ताव करारनामा करण्याच्या अंतिम टप्प्यात असून एका महिन्याभराच्या कालावधीत हृदयरोग संदर्भातील रुग्णांना देखील हाताळू शकणाऱ्या आयसीयू रुग्णवाहिका १०८ प्रणालीच्या ताफ्यात दाखल होतील असे प्रकाश अबिटकर यांनी पत्रकारांना माहिती दिली. विविध आरोग्य संस्थांमध्ये असणाऱ्या १०२ प्रणालीच्या रुग्णवाहिका रुग्णालयात दाखल रुग्णांच्या वाहतुकीसोबत अपघात व इतर गंभीर रुग्णांना संदर्भीय सेवा देण्यासाठी वापरात आणाव्या अशा सूचना त्यांनी आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या. करोना काळात अनेक ठिकाणी प्राणवायू निर्मिती करणारे प्रकल्प उभारण्यात आले तसेच मोठ्या प्रमाणात प्राणवायूच्या सिलेंडरची खरेदी करण्यात आली होती. सध्या हे प्रकल्प वापरत नसून अशा प्रकल्पांचा सार्वजनिक उपयोग करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभाग विचार करत असल्याचे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. आरोग्य विभागात चांगली कामगिरी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना उत्तेजनार्थ प्रोत्साहन भत्ता देण्याचे निश्चित झाले असताना कामचुकारपणा करणे, वेळ मारून नेण्याची प्रवृत्ती जोपासण्याची प्रवृत्ती असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल असा संकेत दिले. राज्यभरात संदर्भीय सेवा देताना गर्भवती महिलांना १०८ प्रणाली मधून इतर रुग्णालयात स्थलांतर करताना धावत्या रुग्णवाहिकेत झालेल्या प्रसूतींच्या प्रकारांची दखल घेऊन त्या सदर्भात राज्यभरात लेखापरीक्षण करणे व संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागविण्याचे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचित केले. या प्रकरणात दोषी आढळल्यास संबंधिताविरुद्ध कारवाई करण्यात येईल असेही आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पालघर जिल्हा निर्मितीला १० वर्षांचा कालावधी उलटला असला तरी या ठिकाणची आरोग्य व्यवस्था सक्षम नसल्याने आरोग्य मंत्री यांनी चिंता व्यक्त केली. सन २०१९ मध्ये बांधकाम सुरू केलेले मनोर येथील ट्रॉमा सेंटर येत्या सहा महिन्यात कार्यरत करण्यासाठी व जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करणार असल्याचे सांगितले. या ट्रॉमा केअर सेंटरसाठी निधीची उपलब्धता, पद मान्यता व कर्मचारी अधिकाऱ्यांची उपलब्धता करून देणार असून त्या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे पालघर येथील सामान्य रुग्णालय उभारणीचे काम समाधानकारकरित्या सुरू असले तरीही उपलब्ध झालेल्या



वास्तूचा आरोग्य सेवेसाठी लवकरात लवकर वापरत आणून जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्नशील राहील असे सांगण्यात आले. या रुग्णालयाच्या कामासाठी तसेच रुग्ण खाटांची संख्या वाढवण्यासाठी आवश्यक ७५-८० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येईल असे ते म्हणाले. पालघर जिल्ह्याला पुढील सहा महिन्यात चांगल्या प्रकारच्या आरोग्य सुविधा मिळतील असे आश्वासित करताना या दोन्ही प्रमुख रुग्णालय तसेच आरोग्याशी संबंधित इतर समस्या सोडवण्यासाठी मंत्रालयात तात्काळ विविध विभागांची संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात येईल असेही आरोग्य मंत्री यांनी स्पष्ट केले.

पालघर जिल्ह्यातील आरोग्य समस्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अनेकदा विधिमंडळात प्रश्न उपस्थित केले. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात निधी देऊन देखील आरोग्याच्या समस्या सुटत का नाहीत हे पाहण्यासाठी आपण प्रत्यक्ष दौरा करण्याची आखले असल्याचे प्रकाश अबिटकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. पालघरच्या सामान्य रुग्णालयाच्या बांधकामाचा दर्जा समाधानकारक असल्याचे सांगताना मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटर चे बांधकाम समाधानकारक नसल्याचे त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलवून निदर्शनास आणून दिले. स्थानिक पातळीवरील प्रश्नांचे महत्त्व आपल्याला समजले असून अपूर्ण काम पूर्ण व्हावीत व उभारलेल्या आस्थापना उपयुक्त ठराव्यात यासाठी नियोजन करणार असल्याचे प्रतिपादन केले. पालघर मध्ये इतक्या क्षमतेच्या रुग्णालयांची आवश्यकता आहे का या संदर्भात पत्रकार व पक्षीय कार्यकर्त्यांकडून माहिती घेतली. तसेच पालघर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्या संदर्भात सद्यस्थिती जाणून घेतली. पालघर जिल्ह्याच्या शहरी भागासह जव्हार भागात देखील आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे असे पत्रकारांतर्फे सुचवण्यात आले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

17 TO 23 MARCH 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 3/15/2025 8:27 PM Page 1



# रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे -शिक्षणाधिकारी नागेश मापारी




**लातूर/प्रतिनिधी**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. विद्यार्थी व शिक्षकांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी केले. येथील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजचे आंतरवासिता शिबिर सुरू असून या शिबिरांतर्गत मंगळवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी मापारी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी उपशिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. डॉ.एन.के. सय्यद, प्रा. एच. बी. पडवळ, प्रा. ए. यू. करदुरे, राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या शिबिराची सुरूवात झाली. राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचा हा रक्तदान शिबिराचा उपक्रम स्तुत्य असल्याचे यावेळी शिक्षणाधिकारी मापारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, सध्या रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिरांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. रक्तदान शिबिरे ही काळाची गरज बनली असून यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी श्रीकांत पांचाळ, रोहित डोंगरे, राधा जगताप, गिरीधर वाघमारे, राजीव मुंढे, पांडुरंग सुडे, विजयकुमार पवार, रविकुमार सोनवणे, अमरेश्वर शिवणे, गणेश कांबळे, सतीश जाधव, ऋषिकेश लंकाळे, मारोती गित्ते, पवन नवगिरे, विठ्ठल पेठे आदी विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन सुमित जोशी यांनी केले तर आभार प्रियंका वाघमारे यांनी मानले.

# पालघर जिल्हा परिषद येथे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज जिल्हा परिषद पालघर येथे साजरी करण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, प्रकल्प संचालक (जलजीवन मिशन) अतुल पारसकर, जिल्हा कृषी विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी, कार्यकारी अभियंता (बांधकाम) जागृती संखे तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे गावात झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या विकासाची भक्कम पायाभरणी केली. अशा थोर महापुरुषाची जयंती आज साजरी करण्यात आली.

# भिवंडी-वाडा-मनोर रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तात्काळ कार्यवाहीचे खा.हेमंत सावरा यांचे निर्देश



**वाडा/प्रतिनिधी**

भिवंडी-वाडा-मनोर या मार्गाचे काम ईगल इंट्रोडक्शन या कंपनीला दिले असून, सदर कंपनीने रस्त्याच्या एका बाजूचे संपूर्ण खोदकाम केले आहे. मात्र, काम अत्यंत संथगतीने सुरू असल्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण झाले आहेत. सध्या वाहतूक सुरू असलेल्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, संपूर्ण मार्गावर धुळीचे साम्राज्य आहे. यामुळे नागरिकांना व वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात खासदार डॉ.हरमंत सवरा यांनी या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे डेप्युटी इंजिनिअर पालघर विभाग पोपट चव्हाण, प्रोजेक्ट मॅनेजर दीपक पवार समक्ष बोलावून घेऊन. त्यांना रस्त्याच्या सध्या सुरू असलेल्या वाहतूक मार्ग सुस्थितीत करणे, रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यांची तत्काळ दुरुस्ती करून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या कामास गती द्यावी, जेणेकरून नागरिकांना अधिक काळ त्रास सहन करावा लागणार नाही. तसेंच पावसाळ्याच्या तोंडावर रस्ता वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही या अनुषंगाने ट्राफिक नियंत्रित करणारे कर्मचारी नेमावे, दिशादर्शक फलक लावावे इत्यादी सूचना केल्या. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कार्यवाही करावी, अन्यथा कठोर उपाययोजना केली जाईल, असा स्पष्ट इशारा यावेळी खासादर सवरा यांनी दिला.

# शिवनेरी बसने तिघांना चिरडले!

**मुंबई/प्रतिनिधी**



मुंबईत शिवनेरी बस चालकाने तिघांना चिरडल्याची घटना घडली आहे. या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला आहे तर अन्य तिघे गंभीर जखमी आहेत. बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्या MTDC बस चालकाने तिघांना चिरडल्याची घटना प्रभादेवी ब्रिजवर मध्यरात्री २.३० वाजता घडली. प्रणय बोडके (२९), करण शिंदे (२९) आणि दुर्वेश गोरडे हे तिघेजण स्कुटरवरून परेलवरून दादरला होळीसाठी फुले आणण्यास चालले होते. त्याचवेळी समोरून शिवनेरी बस चालकाने ब्रिजवरुन चुकीच्या दिशेने भरधाव वेगाने आला. बस चुकीच्या दिशेने घेऊन आल्यानंतर समोरुनयेत असलेल्या दुचाकीला धडक दिली. भरधाव वेगात आलेल्या शिवनेरी बस चालकाने तिघांना चिरडले. यामध्ये प्रणय बोडके याचा केईएम रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तर दुर्वेश आणि करण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ग्लोबल रुग्णालयात उपचार सुरु आहेत. इकबाल शेख असे चालकाचे नावं असून तो MSRTC ची निळ्या रंगाची बस MH12VF3305 चालवत होता. चालक पळून जाण्याच्या तयारीत असताना उपस्थित लोकांनी त्याला पकडून भोईवाडा पोलिसांच्या ताब्यात दिले.

# नॅशनल युनियन ऑफ सिफेअरर्स ऑफ इंडियातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा




**वसई/प्रतिनिधी**

नॅशनल युनियन ऑफ सिफेअरर्स ऑफ इंडियाच्या (न्यूसी) वतीने वसईत आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. न्यूसीच्या महिला विभागातर्फे संघटनेचे जनरल सेक्रेटरी मिलिंद कांदळगावकर व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार यावर्षी सेंट झेवियर चर्च शाळा, गिरीज येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वसई पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर व त्यांचे सहकारी अधिकारी यांनी उपस्थित राहून 'महिला सुरक्षा व सायबर गुन्हे' या विषयावर कार्यक्रमाला उपस्थित महिला सभासद व त्यांचे कुटुंबीय यांना मार्गदर्शन केले. यावेळी मनोरंजनासाठी विविध खेळ व स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. नॅशनल युनियनच्या मुंबई कार्यालयातून सौ. रमिलाबेन सोलंकी व सौ. सुधा फर्नांडो उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नॅशनल युनियनची वसई टीम व नॅशनल युनियन महिला विभाग यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनीची उपस्थिती होती.

# विरार मनवेलपाडा येथे महिला स्नेह संमेलन संपन्न



**विरार/प्रतिनिधी**

बहुजन विकास आघाडी अध्यक्ष लोकनेते हितेंद्र ठाकूर, प्रथम महापौर राजीव पाटील, मा.आमदार क्षितिज ठाकुर यांच्या मार्गदर्शनानुसार बहुजन विकास आघाडी मनवेल पाडा विभाग वार्ड क्रमांक २५,२६, २७,२८, ३०, ३७ व देवराम नगर, कोकण नगर, आई बाबा नगर, कोयना नगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन ८ मार्च व संघटक सचिव माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील वाढदिवस ९ मार्च यानिमित्त महिला स्नेह संमेलन (सखी मेळावा) कार्यक्रमाचे आयोजन देवरामनगर प्रतिष्ठान, ब्रह्मदेव मैदान खदान रोड मनवेलपाडा गाव येथे करण्यात आले होते. या समयी सिने अभिनेता सुशांत घाटसावळीकर यांच्या होम मिनिस्टर अर्थात खेळ पैठणीचा कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी मनोरंजक खेळ, उखाणे, डान्स इत्यादी विविध स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. विविध स्पर्धा विजेत्या महिलांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते उपस्थित महिलांमधून लकी ड्रॉ काढून गिता गणेश रासम, मानसी दीपक नवाले, सुधा बबन कांबळे या ३ भाग्यवान महिलांना मोत्याची नथ व रेशमा शिवाजी सिसोदे, प्रणाली प्रवीण गोरुले, रोहिणी राहुल आग्रे या ३ भाग्यवान महिलांना पैठणी साडी देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, माजी प्रभाग 'ब' सभापती चिरायू चौधरी, माजी नगरसेविका मीनल पाटील, संगीता भेरे, हेमांगी पाटील, बहुजन विकास आघाडी कार्यकर्ते विनोद पाटील, अतुल पाटील, देवराम नगर प्रतिष्ठान संस्थापक बहुजन विकास आघाडी कार्यकर्ते योगेश बंधू पाटील, कोकण नगर रहिवासी संघाचे अध्यक्ष विनायक शिगवण, आई बाबा सेवा संस्था अध्यक्ष प्रवीण शिंदे, कार्याध्यक्ष महेंद्र गायकर, देवराम नगर रहिवासी संघाचे आकाश सरवणकर, कोकण नगर महिला मंडळाच्या ममता शिगवण, माधवी पाटील, पूर्वा साळवी, तन्वी ठोंबरे, देवराम नगर महिला मंडळाच्या तनुजा म्हापदि, प्रियांका माटल, प्रियांशी साळवी, प्रियांका परब, आई बाबा नगर महिला मंडळाच्या प्रज्ञा शिंदे, उषा भिसे, प्राची शिर्के, बहुजन विकास आघाडी विभागीय पदाधिकारी कार्यकर्ते महिला मंडळ कार्यकर्ते महिला वर्ग उपस्थित होते.

# विक्रमगड येथे पी.एम.किसान सन्मान योजना शिबिर



**विक्रमगड/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग तालुका कृषी कार्यालय विक्रमगडतर्फे पी.एम. किसान सन्मान योजना शिबिर उत्साहात संपन्न झाले. संत रोहिदास सभागृह, रोहिदास नगर, विक्रमगड येथे नुकतेच या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास विक्रमगड तहसीलदार चारुशीला पवार व विक्रमगड पंचायत समिती गटविकास अधिकारी मिलिंद जगदाळे यांनी भेट दिली. या शिबिरात प्रलंबित ई-केवायसी, एनपीसीएल मेंपिंग, लैंड सिडींग, वनपट्टेधारक व कातकरी समाज बांधव यांना लाभ, ॲग्रीस्टेंक नोंदणी, आधार कार्ड मोबाईल नंबर लिंक करणे, याचे प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. येत्या काळात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी या योजनेचे हप्ते मिळवण्याकरता ॲग्रीस्टेंक नोंदणी करणे आवश्यक आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घेतला.

# जुन्या वाहनांवर ३० एप्रिल पर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी**

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुनहे कमी करणे, रस्तयावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व वाहनांना एच.एस.आर.पी. बसविणे अत्यावश्यक असून याबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्देशही दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वाहनांना एच.एस.आर.पी. बसविण्याचे महत्व लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने ९ एप्रिल, २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना एच.एस.आर.पी. बसविण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर जिल्ह्यातील १ एप्रिल, २०१९ पूर्वी उत्पादित झालेलया सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना एच.एस.आर.पी. फिटमेंट सेंटर येथून एच.एस.आर.पी. नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. परिवहन विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in/ZoneWise WebsiteRedirect. html या संकेतस्थळाचा वापर करून लातूर जिल्हयातील अधिकृत फिटमेंट सेंटरवर एच.एस.आर.पी. नंबर बसविण्यासाठी बुकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. एच.एस.आर.पी. नंबर प्लेट बसविण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल, २०२५ रोजी पर्यंत आहे.लातूर जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांना आवाहन करण्यात येते की, वाहनधारकांची फसवणूक टाळण्यासाठी परिवहन विभागाच्या संकेतस्थळावरील अधिकृत लिंकचा वापर करुन एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी बुकींग करावी. एच.एस.आर.पी. बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी केले आहे.

# लाखोंचे दागिने घेऊन फरार नोकराला पोलिसांनी मध्यप्रदेशातून केली अटक



**नालासोपारा/प्रतिनिधी**

वसईतील प्रसिद्ध व्यावसायिक प्रदीप गुप्ता यांच्या सेवा विवेक केंद्रातील आयुर्वेदीक पंचक्रम केंद्रात काम करणाऱ्या नोकराने गुप्ता यांच्या १७ लाखांच्या दागिने आणि मौल्यवान ऐवजावर डल्ला मारला आहे. नालासोपारा पोलिसांनी याप्रकरणी ४८ तासात मध्यप्रदेश येथील खांडवा रेल्वे स्थानकातून आरोपीला अटक केली. प्रदीप गुप्ता हे वसईतील प्रसिध्द व्यावसायिक आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत. ते मुंबई अहमदाबा महामार्गावरील भालिवली येथील सेवा विवेक संस्थेचे संस्थापक तसेच मुंबई तरूण भारत दैनिकाचे विश्वस्त आहेत. सेवा विवेक केंद्राचे नालासोपारा पश्चिम येथे 'वेदस आयुर्वेदीक' नावाचे पंचकर्म केंद्र आहे. मंगळवारी संध्याकाळी ७ वाजता प्रदीप गुप्ता आपल्या केंद्रात उपचारासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या अंगावरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम, आयफोन तसेच रॉलेक्स घड्याळ काढून ठेवले होते. त्या केंद्रात काम करणारा नोकर राकेश पांडे (३२) याने ते दागिने आणि रोख रक्कम घेऊन पळ काढला. एकूण १७ लाख ५ हजारांचा ऐवज त्याने चोरला होता. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी राकेश पांडे या अवघ्या १५ दिवसांपूर्वी या केंद्रात कामाला आला होता. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे त्याचा माग काढण्यास सुरवात केली. आरोपी पांडे मोबाईल मधील सिम कार्ड बदलत पोलिसांना चकमा देत होता. अखेर त्याने मध्यप्रदेशात पळून जाण्यासाठी ट्रेन पकडली. नालासोपारा पोलिसांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेने खांडवा पोलिसांशी संपर्क साधून त्याला धावत्या ट्रेन मधून खांडवा रेल्वे स्थानकात अटक केली. गुन्हा दाखल केल्यापासून अवघ्या ४८ तासात अटक करण्यात पोलिसांनी यश आले. आम्ही मुंबईतील नामांकित एजन्सीकडून या नोकराची नियुक्ती केली होती. त्याची सर्व पडताळणी कंपनीने केली होती. त्यामुळे आम्ही निर्धास्त होतो. तरी देखील त्या नोकराने चोरी केली अशी माहिती तक्रारदार प्रदीप गुप्ता यांनी दिली. परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त विजय लगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल वळवी, पोलीस निरीक्षक अमरसिंह पाटील (गुन्हे) गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र चंदनकर, पोलीस निरीक्षक योगेश मोरे, पोलीस हवालदार प्रशांत साळुंखे, अमोल तटकरे, कल्याण बाचकर, राजेंद्र नादुलकर, प्रेम घोडेराव, प्रताप शिंदे, बाबा बनसोडे, सोहल शेख आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

# विरार पोलीस ठाण्यात महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम



**विरार/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय महिला व बाल गुन्हे प्रतिबंधक विभागाचे २२ जानेवारी २०२५ रोजी बेटी बचाओ बेटी पढाओ उपक्रमाला दहा वर्षे पूर्ण झाली, त्याअंतर्गत ८ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला पोलीस आयुक्त व महिला पोलीस आयुक्त विरार समिती सदस्यांची संयुक्त बाईक रॅली काढण्यात आली विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लालू तुरे यांच्या अध्यक्षतेखाली सदर बाइक रॅली मनवेलपाडा ते विरार पोलीस स्टेशन मार्गे निलगिरी टॉवर सिग्नल आरजे नाका जीवदानी रोडने काढण्यात आली. बाईक रॅलीमध्ये १२ महिला कॉन्स्टेबल, ५ महिला होमगार्ड, ३ महिला अधिकारी आणि इतर १५ ते २० महिला सहभागी झाल्या होत्या.

# उल्हासनगरात खड्ड्यामुळे युवा डॉक्टरचा दुर्दैवी मृत्यू

**उल्हासनगर/प्रतिनिधी**



उल्हासनगरच्या कॅम्प तीन परिसरातील १७ सेक्शन हिरा घाट परिसरात रविवारी डॉ. हनुमंत डोईफोडे प्रवास करत असताना दुपारी दोनच्या सुमारास खड्ड्यामुळे दुचाकी घसरली आणि ते पडले. त्यानंतर त्यांना तातडीने कल्याणच्या खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र अती रक्तस्त्राव आणि फुफुसाला इजा झाल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्यावर उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रूग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. डॉ. हनुमंत डोईफोडे मुळचे बीड जिल्ह्यातील केजकासरी या गावातील होते. ते गेल्या दीड वर्षांपासून उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रूग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टर म्हणून काम करत होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि सहा महिन्यांची मुलगी आहे. या घटनेनंतर उल्हासनगर शहरातील खड्ड्यांवरून पालिका प्रशासनावर नागरिकांकडून टीकेची झोड उठवली जाते आहे. या भागातील रस्त्याची दुरावस्थे गेल्या अनेक महिन्यांपासून कायम आहे. याबाबत सातत्याने तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जाते आहे. या भागात फोटो प्रक्रिया आणि वाहनांच्या सुट्या भागाच्या दुकानांचे बाजार आहे. त्यामुळे येथे दररोज हजारो ग्राहक येत असतात. त्यानंतरही येथील रस्त्यांची स्थिती सुधारत नसल्याने नागरिकांत संताप आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस अधिक तपास करत आहेत.

17 TO 23 MARCH 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/15/2025 8:27 PM Page 1



पान १ वरून....

## जन्मदात्या आईला त्रास द्यायचा फार...

समोर आले आहे. याप्रकरणी डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. अशोक रामराव पाठक असं अटक केलेल्या डॉक्टरचे नाव आहे. सोमनाथ रामराव पाठक यांचा मृतदेह सोमवारी सकाळी संत्र्यांच्या शेतात आढळून आला होता. मयत झालेला सोमनाथ याला दारू पिण्याचे व्यसन होते. तो आई व स्वतःच्या मुलाला सतत मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी देत असे. रविवारी डॉक्टर असलेला भाऊ त्याला समजावून सांगण्यासाठी सातवडला गेला होता. त्याच्यासमोरच सोमनाथ याने आई व स्वतःच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी दिली. या रागातून डॉक्टरने सोमनाथ याला लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यानंतर सोमनाथ हा संत्र्यांच्या शेतात पळाला. डॉक्टरने पाठलाग करत पकडून त्याला संत्र्याच्या झाडाला बांधले. त्याची हालचाल थांबल्याने डॉक्टर तेथून निघून गेला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने डॉक्टरचा शोध घेऊन त्याला अटक केली असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. पुढील तपास पाथर्डी पोलिस करत आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखालील पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, सुरेश माळी, ज्ञानेश्वर शिंदे, संदीप दरंदले आदींच्या पथकाने केली. आईला दिसला मृतदेहमयत सोमनाथ यांच्या आई सिंधूताई पाठक या सोमवारी पहाटे मोटार चालू करण्यासाठी गेल्या असता त्यांना मुलाचा मृतदेह संत्र्याच्या शेतात दिसला. त्यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. दरम्यान, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक आहेर यांनी घटनास्थळी भेट देता गुन्ह्याचा छडा लावला. भावाला लागले दारूचे व्यसनडॉक्टरने भावाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्यासमोरच भावाने स्वतःच्या मुलाला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. मयताचेही मेडिकल होते. परंतु, त्याला दारूचे व्यसन लागले. त्यामुळे दोघा भावांमध्ये वारंवार वाद व्हायचे. भाऊ दारू सोडायला तयार नव्हता. यातूनच डॉक्टरने भावाला मारहाण केली. त्यात त्याचा मृत्यू झाला. असा झाला खुनाचा उलगडापोलिस निरीक्षक आहेर यांच्यासह पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास केला. सुरुवातीला हे प्रकरण वेगळे असल्याचा संशय होता. परंतु, चौकशीत विसंगती आढळून आल्याने पोलिसांना संशय आला. पोलिसांनी मयताचा भाऊ डॉक्टरला ताब्यात घेतले.

## लग्नाच्या घाईने प्रेमाची शोकांतिका झाली...

हल्ली तर तिच्याच जीवावर घर चालत होते. ती फक्त आपल्या करियरचा विचार करीत होती. आईला आजीला कसे सुखी समाधानी ठेवता येईल याचा ती विचार करीत होती. यातच प्रशांत हा तिच्या मागे लग्न करूया म्हणून सारखा मागे लागलेला होता. प्रशांत हा येल्लुर ता.खानापूर येथील होता. त्याच्या ही घरची परिस्थीती तशी बेताचीच होती. तो नेहमी ऐश्वर्याला भेटण्यासाठी खानापूरहून बेळगावीला येत होता.त्या दोघांची पहिली भेट ही कॉलेजमध्येच झालेली होती. बघता क्षणी तो तिच्या प्रेमात पडला होता. ऐश्वर्या ही दिसायला देखणी आणि सुंदर अशीच होती परंतु तिला तिच्या परिस्थीतीची जाणीव होती. तिने ही त्याच्यावर प्रेम केले होते परंतु लगेच तिला त्याच्याबरोबर लग्न करायचे नव्हते.कारण लग्न केले म्हणजे आईला आजीला कोण बघणार असा तिने विचार केलेला होता. हल्ली प्रशांत ही पेटिंग आणि फरशी फिटिंगची कामे करीत होता. त्यातून त्याला चार पैसे मिळत होते. तसे त्याचे वय ही आता जवळपास ३० वर्षाचे होत आले होते.वय ओलांडल्यावर लग्न जमणे तसे कठिणच होऊन बसले असल्याने त्याला लग्नाची घाई झालेली होती.त्यात ऐश्वर्या ही सध्या १८ वर्षाची असल्याने तिला लग्नाची घाई नव्हती. त्या दोघांचे प्रेम जरी असले तरी त्या दोघात वयाचे अंतर ही तसे जास्तच होते. त्यामुळे ऐश्वर्याच्या घरच्या लोकांना प्रशांत कुडेंकर याचे स्थळ नकोच होते. आपल्या ही घरची परिस्तीती तशी हालाखीची आणि प्रशांतच्या घरची परिस्थीती हालाखीची, त्यामुळे तो आपल्या मुलगीला सुखी ठेवील की नाही याची शंका ऐश्वर्याच्या आजी आणि आईला होती.त्यामुळे ते प्रशांतला लग्नासाठी नकार देत होते. नेहमी काही ना काही कारण सांगून ते त्याला बाजुला नेत होते. बघुया करूया अशी कारणे ते देत होते. ऐश्वर्या ही त्याच्याशी प्रेमसंबंध असले तरी ती त्याला टाळत होती. प्रशांतला याचे नेमके कारण काही कळत नव्हते. तो तिच्या मागे आणि तिच्या घरच्यांच्या मागे लग्नाचा विषय काढून भांडत होता. गेल्या दोन महिन्यापूर्वीच त्याने ऐश्वर्याच्या आईची भेट घेऊन लग्नासाठी परवानगी मागितलेली होती. त्यावेळी तिच्या आईने प्रशांतला स्पष्टच सांगितले की, तू आधी चांगला कामधंदा कर, चांगला पगार मिळव. मग आपण लग्नाचे बघु.त्यांनी असे सांगितल्याने प्रशांत हा मनातून खचला होता. इकडे ऐश्वर्या ही लग्नासाठी हो म्हणत नाही आणि तिच्या घरचे ही लग्नाला परवानगी देत नाहीत याचा अर्थ काय समजायचे ते त्याने समजले होते. पडदया आडून ऐश्वर्या आणि तिच्या घरचे लोक लग्नाला नकार देत आहेत हे त्याने ओळखलेले होते. हल्ली लग्नासाठी मुली मिळत नाहीत म्हणून मुलांची कुचंबना होऊन बसली आहे, आपले कसे होणार याची चिंता प्रशांतला होती. वय झाल्याने बुहदा ऐश्वर्या आपल्याला लग्नास नकार देत आहे हे त्याच्या ही लक्षात आलेले होते. त्याला तर केले तर लग्न तिच्याशीच करायचे होते तो तिच्यासाठी वेडाच झाला होता.तिच्या आईने आणि आजीने लग्नासाठी तु ऐश्वर्याला त्रास देवू नकोस अशी समज ही दिलेली होती. त्यांनी त्याला नकार दिलेला असला तरी त्याच्या डोक्यातून तिचे भुत काही कमी होत नव्हते. तो वारंवार तिला भेटून लग्न कधी करायचे असे विचारीत होता. ती त्याला काही ना काही कारण टाळत होती. आता काय करायचे याचा तो विचार करीत होता. लग्न करायचे तर तिच्याशीच या इरादयाने तो पेटला होता.सारखी विचारणा करून ही ती लग्नाला तयार होत नव्हती. म्हणून त्याने आता वेगळाच विचार केलेला होता. मंगळवार दि.५ मार्च रोजी ऐश्वर्याच्या घरातील आई आणि इतर नातेवाईक हुब्बनहट्टी येथील देवाला गेलेले होते.तिच्या आईने तिला ही देवदर्शनला चल असे म्हटले होते. परंतु ती काही तरी कारण सांगून त्याच्या बरोबर गेली नव्हती.नेमकी हिच संधी साधून प्रशांत हा ऐश्वर्या हिला भेटायला म्हणून तिच्या घरी गेला. जाताना त्याने वेगळाच विचार केलेला असल्याने त्याने आपल्या बरोबर विषाची बाटली, आणि खिशात चाकू ही घेतला होता.सकाळ सकाळी प्रशांत भेटायला आल्याने ऐश्वर्याच्या मनात ही वेगळीच शंका आली तो नेहमी प्रमाणे लग्नाचा विषय काढणार हे तिला माहित होते म्हणून ती त्याला घेऊन शेजाऱ्याच्या घरात गेली.तेथे ते दोघे बोलत बसले असताना प्रशांतने लग्नाचा विषय काढलाच. ती त्याला म्हणाली, मला आताच लग्न करायचे नाही, मला चांगली नोकरी करायची आहे नंतर मी लग्नाचा विचार करेन असे तिने म्हटल्यावर तो तिच्याशी वाद घालू लागला. दोघात वाद चालूच होता. तु माझ्याशी लग्न नाही केलेस तर मी माझ्या जीवाचे काही तरी बरे वाईट करून घेईन अशी धमकी तो तिला देत होता.ती ही त्याच सुरात उत्तर देत म्हणाली, तुला काय करायचे ते कर जा.मला काही देणे घेणे नाही असे तिने म्हटल्यावर त्याला तिचा राग आला.त्याने रागाच्या भरात आपल्या खिशातून चाकु काढला आणि ऐश्वर्याच्या अंगावर, मानेवर, पोटात सपा सप वार करीत तिला खाली पाडले. ती रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडली. जागीच तिचा मृत्यु झाला.तिचा आपल्या हातून खून झाल्याचे त्याच्या लक्षात येताच तो ही हाडबडला. त्याने क्षणाचा ही विचार न करता खिशातून विषाची बाटली काढली आणि ती घटा घटा पिली. त्यासरशी त्याच्या ही तोंडून फेस आला. तो ही तिच्या शेजारीच निपचिप पडला. दोघांचा ही जागीच मृत्यू झाला. ऐश्वर्याच्या ओरडण्याने शेजारचे लोक धावतच घरात आले. ऐश्वर्या ही रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. तर बाजुलाच प्रशांत कुंडकर हा पडला होता. त्याच्या बाजुला विषाची बाटली पडली होती.हे बघून काय समजायचे ते शेजाऱ्यांनी समजले. देवदर्शनाला गेलेल्या तिच्या आईला आणि आजीला या घटनेची माहिती फोनवरून देण्यात आली.त्या ही देवदर्शन अर्धवट सोडून तातडीने बेळगावी येथे आल्या. ऐश्वर्याला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली पाहून आजीने आणि आईन हंबरडा फोडला. प्रशांतच्या नावे शिमगा करीत त्याने का म्हणून आपल्या मुलीचा जीव घेतला आपल्या कोवळ्या मुलीला का मारले याचा त्या जाब विचारू लागल्या होत्या. या घटनेची माहिती शेजाऱ्यांनी शहापूर पोलीसांनी दिली. या घटनेची माहिती मिळताच शहापुर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगावी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी रक्ताने माखलेला चाकु आणि विषाची बाटली पंचनामा करून जप्त करण्यात आली. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथकाला आणि ठसेतज्ञांना पाचारण करण्यात आले होते. या घटनेची माहिती समजताच घटनास्थळी पोलीस आयुक्त याडा मार्टिन मार्बन्यांग, कायदा व सुव्यवस्थेचे डीसीपी रोहन जगदीश, गुन्हे शाखेचे डीसीपी निरंजन असे मार्केटचे एसीपी संतोष सत्यनाईक शहापुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.एस., स.सीमानी यांनी भेट देवून पाहणी केली. या घटनेची माहिती प्रशांत कुंडेकर याच्या घरच्या लोकांना ही देण्यात आली. ते ही येळ्ळुरहून बेळगावीला दाखल झाले. या घटनेची फिर्याद मयत ऐश्वर्या लोहार हिच्या आईने शहापूर पोलीसात दिली. त्याच्या फिर्यादीवरून शहापूर पोलीसांनी ऐश्वर्या महेश लोहार (वय१८) हिच्या खून प्रकरणी आणि प्रशांत कुंडेकर (वय २९) याने आत्महत्या केल्या प्रकरणी मयत प्रशांत यल्लाप्पा कुंडेकर (वय २९) रा.येळ्ळुर याच्या विरोधात गुन्हा दाखल करून घेतला. या दुहेरी घटनेची माहिती पोलीस आयुक्त याडा मार्टिन मार्बन्यांग यांनी प्रसार माध्यमांना दिली. या घटनेचा पुढील तपास शहापुर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

## अभिषेकची चुगली करून संतोष फसला...

पत्नीला अभिषेक हा मटका खेळतो, जुगार खेळतो, बाईचे लफडे करतो असे सांगितले होते. या कारणामुळे आरोपीच्या कुटुंबात वाद झाले होते. या प्रकरणाचा राग मनात धरून आरोपी अभिषेक याने १२ मार्च रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मयत नागेश यास दंडुक्याने गंभीर मारहाण केले. यात तो रक्तबंबाळ अवस्थेत तेथे पडला. ही घटना फिर्यादी लिंबुबाई यांना कळाल्यानंतर त्यांनी लगेच नागेश याला रिक्षातून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान नागेशचा मृत्यू झाला, अशा आशयाची फिर्याद लिंबुबाई विटकर यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुहास चव्हाण करत आहेत. आरोपींना पोलिस कोठडीदोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली. त्या दोघांना शुक्रवारी कोर्टासमोर हजर केल्यानंतर आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## शिवीगाळ केल्याचा भयंकर राग...

निरीक्षण केले असता, मृतकाच्या डोक्यातून रक्त निघाल्याचे दिसत होते. त्याच्या शरीरावर मारहाणीच्या जखमा तर गळ्यास व्रण दिसत असल्याने, मृतकाचा खून करून प्रेत दरीत फेकल्याचा पोलिसांचा संशय होता. पोलिसांचा घटनास्थळ पंचनामा सुरू असताना घटनास्थळी आलेल्या काही लोकांनी मृतकास तो जिजामाता नगरातील संतोष शिंदे असल्याचे पोलिसांना सांगितले. काही वेळात संतोष शिंदेचे नातेवाईक आक्रोश करीत घटनास्थळी आले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा इतर कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून प्रेत पोस्टमार्टमसाठी सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालयात पाठवले. संतोष शिंदे या युवकाचा अज्ञाताने खून करून प्रेत दरीत टाकल्याची खबर पसरल्याने एकच खळबळ निर्माण झाली. दुसऱ्या दिवशी पोस्टमार्टम झाल्यावर मोठ्या शोकाकुल वातावरण मृतक संतोषवर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान पोलिसांनी गुप्त खबऱ्यामार्फत घटनेबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला. असतापोलिसांना मृतकाचे घरा जवळ काही अंतरावर राहणारा अक्षय मेहर याचा संतोष शिंदेच्या खुनात हात असावा, अशी माहिती मिळाल्याने, पोउपनिरी बालाजी सानप यांनी अक्षयवर तपासाची दिशा केंद्रित केली. घटनेच्या अगोदरच्या रात्री अक्षय हाच संतोषला दुचाकीवर बसवून घेऊन गेल्याचे निष्पन्न होत होते. मृतकाचा लहान भाऊ दत्ता प्रभू शिंदे यांनी, अक्षय मेहर याचे विरोधात तक्रार दाखल केल्याने, सिंदखेड (राजा)पोलिसांनी संतोष शिंदेखून प्रकरणी आरोपी अक्षय शांतीलालमेहर याच्यावर अपक्र २२/२५ कलम १०३(१),२३८, ३ (५),भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करून, पोलिसांची पथके फरार आरोपी अक्षयच्या शोधासाठीरवाना झाली. पोलिस आरोपीचा युद्धपातळीवर शोध घेत असतांना, २१ फेब्रुवारीस वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथून स्थागुशाचे सपोनी आशिष रोही यांचे नेतृत्वात पोहेकॉ दिगंबर कपाटे, पो कॉ दीपक वायाळ, वैभव मगर, पुंड या पोलिस पथकाने आरोपीस सापळा रचून ताब्यात घेतले, दुसऱ्या दिवशी स्थानिक न्यायालयासमोर आरोपीसउभे केले असता, वि. न्यायालयाने आरोपी अक्षय मेहर यास २७ फेब्रुवारी पर्यत पोलीस कोठडी सुनावली, मृतक संतोषने एकदा अक्षय यास शिवीगाळ केल्याने, अक्षयने त्याचा निर्घृणपणे खून केल्याचे पोलिसाच्या प्राथमिक तपासात निष्पन्न होत आहे. सिंदखेड (राजा) येथील जिजामाता नगरात संतोष उर्फ चंद्रपाल प्रभू शिंदे वय ३४ हा आई -वडिलांसह राहायचा, त्याचा लहान भाऊ नवी मुंबई येथे टॅक्सी चालवतो.अविवाहित असलेला संतोष मजुरीचे काम करीत होता. त्याच्या घरापासून काही अंतरावर अक्षय शांतीलाल मेहेर वय २९ हा राहतो. अक्षय विवाहित असून त्याला दोन चिमुकली मुले आहेत. अक्षय जवळ शेती असून, तो शेती पाहायचा. अक्षय सनकी तेवढाच क्रूर होता, त्याला कोणाचेहीत्याच्याविरोधातबोलणे आवडत नव्हते, त्याला उलट शब्द जो बोलला त्याला अक्षयने चांगलेच चोपले होते. म्हणूनच त्या परिसरात त्याची दहशत होती. संतोष शिंदे हा कधीकधी अक्षयच्या शेतीत मजुरीने काम करीत होता. त्यामुळे दोघांची चांगली ओळख होती. या चांगल्या ओळखीतूनच ते कधीकधी एकत्र बसून 'पॅक' सुद्धा मारायचे. एक दिवस असेच दोन तीन 'पॅक' मारून नशेत संतोषने लोकांसमोर अक्षयला शिवीगाळकेल्याने, अक्षय चांगलाच बिथरला संतोषने आपलाअपमान केल्याचे शल्य त्याला बोचत होते. म्हणून त्याने १४ फेब्रुवारीला संध्याकाळी संतोषला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी त्यांच्यातील वाद संतोषच्या आईने सोडवला होता. त्यावेळी अक्षयने वादातून माघार घेतली असली तरी, त्याच्या डोक्यातून मात्र संतोष विषयीचा क्रोध काही केल्या जात नव्हता, अती क्रोध ही अक्षयमधे असलेली विकृतीच होती. संतोषला केलेल्या अपमानाची किंमत चुकवावीच लागेल असे मनात ठरवत, अक्षय १७ फेब्रुवारीला रात्री ९ वाजता संतोष सोबत जाणून बुजून गोड बोलू लागला, आता सर्वकाही अक्षय विसरला असे संतोषला वाटले, म्हणूनच 'चल बाहेरून येऊ' असे अक्षयने म्हणताच संतोष त्याचे गाडीवरबसला. अक्षय काही वेळ इकडे तिकडे फिरून सरळ गाडी शेतात घेऊन गेला. तेथे रात्रीच्या अंधारात अक्षयने रागाने लालबुंद होऊन संतोषला मारहाण करण्यास सुरुवात केली. संतोष प्रतिकार करीत असल्याचे लक्षात येताच क्रूर, क्रोधी अक्षयने दोरी घेऊन संतोषचा गळा ताकदीने आवळला. आडदांड अक्षयपुढे अंगकाठीने कृश संतोषचा प्रतिकार थिटा पडल्याने, टाचा घासत संतोष काही क्षणात मृत झाला. संतोषचा मृत्यू झाल्याचे समजताच, अक्षयने एका चादरीत संतोषचा मृतदेह गुंडाळून पोत्यात भरला, पोते (गोणी) दुचाकी वर ठेवून दोरीने बांधले व दुचाकी घेऊन ५०० मीटर अंतरावर असलेल्या, ऐतिहासिक मोती । तलावाच्या भिंतीजवळ आला. तेथे एका पन्नास फूट खोल दरीत मृतदेह टाकून, संतोष दारू पिऊन दरीत पडला असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र संतोषच्या गळ्याला असलेला व्रण आणि शरीरावरील मारहाणीच्या खुणा अक्षयच्या पापाचा पाढा जणू पोलिसांसमोर वाचत होते. त्यावरूनच पोलिसांनी ४८ तासात या घटनेचा उलगडा केला. न्यायदेवता आरोपीस काय? सजा देईल ते येणाऱ्या काळात समजेल, मात्र एवढ्या छोट्याशा कारणावरून अमानूष मारहाण करून गळा आवळून खून करणे कितपत योग्य आहे. कदाचित यासाठीच क्रोधावर अनियंत्रण म्हणजे पुढील अघटीत घटनेचे निमंत्रण असे म्हटले जात असेल. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलिस अधीक्षक बी बी महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, सिंदखेड (राजा) पोलीस स्टेशन ठाणेदार पो.नि. ब्रह्मदेव शेळके, सपोनी तुषार जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बालाजी सानप, पोलीस कॉन्स्टेबल राऊत, संदीपडोंगरे, शंकरतांबेकर, अमोल भुतेकर करीत आहेत.

पान ८ वरून....

## प्रिंट मिडीयाला मरण नाही...

प्राथमिक शिक्षण दर्जेदार झाले पाहिजे यावर आपला भर असून, मतदार संघातील सार्वजनिक ग्रंथालयांना निधी देवू, सार्वजनिक ग्रंथालयांचे आणि कर्मचार्यांच्या प्रश्नासाठी आपण योग्य वेळी, योग्य ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या खांद्याला खांदा लावून काम करु,कर्मचार्यांच्या वेतनश्रेणीबाबतचा योग्य प्रस्ताव द्या राज्याचे मुख्यमंत्री, अर्थमंत्री व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांची भेट घेवून यात मार्ग काढू अशीही ग्वाही आ.पवार यांनी यावेळी दिली. अध्यक्षीय समारोपात डॉ.गजानन कोटेवार यांनी सार्वजनिक ग्रंथालयांचे अनुदान वाढ, दर्जा बदल, नवीन ग्रंथालयांना मान्यता याबरोबरच ग्रंथालय कर्मचार्यांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकून ग्रंथालय चळवळीला आ.अभिमन्यु पवार यांच्यामुळे न्याय मिळेल असा विश्वास व्यक्त केला. सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी आ.अभिमन्यु पवार यांच्यामुळे ग्रंथालय चळवळीला नवजीवन मिळाल्याचे सांगितले, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी पुणे येथील ग्रंथमेळ्यामध्ये प्रचंड ग्रंथ खरेदी झाल्याने वाचन संस्कृती विस्तारत असल्याचे नमुद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्य कार्योपाध्यक्ष राम मेकले यांनी केले. तर साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे प्रमुख कालिदास माने यांनी स्वागतर भाषणात लोकनेते विलासरावानंतर आ.पवार यांच्या रुपाने सर्वसमावेशक,अभिमान वाटावा असा विशाल मनाचा नेता मिळाल्याचे सांगून ग्रंथालये आणि कर्मचाऱ्यांना ते न्याय मिळवून देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रारंभी डॉ.एस.आर. रंगनाथन् यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आ.अभिमन्यू पवार यांची ग्रंथतुला करण्यात येवून ते ग्रंथ जिल्हा परिषद शाळांना भेट देण्याचे जाहीर करण्यात आले.सर्व मान्यवरांचे शाल, स्मृतीचिन्ह, तुळशीचे रोपटे देवून स्वागत करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय संघाचा कै.त्र्यंबकदास झंवर (काका) राज्यस्तरीय आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार (११ हजार रुपये रोख, शाल, स्मृतीचिन्ह, ग्रंथ) कुंडलिक मोरे यांना कै.मारुती चिरके आदर्श ग्रंथपाल पुरस्कार (अडीच हजार रुपये, शाल, स्मृतीचिन्ह, ग्रंथ) पुरस्कार प्रकाश सोनकांबळे यांना तसेच राज्य शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार विजेते युवराज जाधव यांचा व नागाबुवा वाचनालय हेरंब पुरस्कार ॲड.शशिकिरण पाटील यांना आ.पवार यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले जिल्हा या सत्राचे सूत्रसंचालन पी.सी.पाटील व प्रा.सतीष हानेगावे यांनी केले. या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने सकाळी ९ ते १० वाजेच्या दरम्यान अवंतीनगरातील सानेगुरुजी विद्यालय ते कातळे नगरातील नंदादिप शाळेपर्यंत शालेय विद्यार्थी, बंजारा महिला, वारकरी महिला, ग्रंथालय चालक, कर्मचारी, साने गुरुजी संकुलातील कर्मचारी, नागाबुवा वाचनालयाचे पदाधिकारी, ढोल ताशा, हालगी वादकांच्या सहभागाने विशाल ग्रंथ दिंडी काढण्यात आली. आरंभी पंडितराव धुमाळ व कालिदास माने यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करण्यात आले. धर्मादाय सह आयुक्त आ.ए.सासणे यांच्या अध्यतेखाली महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चा कायदा व विश्वस्त बदल अर्ज आणि इतर माहिती मार्गदर्शन या विषयावर झालेल्या दुसर्या चर्चासत्रात धर्मादाय उपायुक्त एस.व्ही.एच.कादरी यांनी अतिशय सोप्या भाषेत विश्वत कायदा व अर्ज बदल याविषची अवगत केले. या सत्राचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अध्यक्ष प्रभाकर कापसे यांनी केले, कार्याध्यक्ष राम मेकले यंनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी साने गुरुजी संकुलाचे प्रमुख कालिदास माने, कोषाध्यक्ष सुरेखा माने, प्राचार्य विवेक माने, महादेव खिचडे, नागाबुवा वाचनालयाचे पदाधिकारी, जिल्हा ग्रंथालय संघाचे हागवीराव बेरकीळे, काशिनाथ बोडके, बाळकृष्ण होळीकर, किरण बाबळसुरे, अशोक खोडवे, सिरसे, घोगरे, राजकुमार सोनी, गुप्तलिंग स्वामी, अजित पाटील, गोकर्णा सुर्यवंशी, बाळ होळीकर, राम मोतीपवळे, सुशील मेकले, गिरीधर जंगाले, नागनाथ बिरादार, मुख्याध्यापिका उषा आडे आदींनी सहकार्य केले. अधिवेशनाला मोठ्या संख्येने ग्रंथालय चालक व कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## नविन शैक्षणिक धोरणातुन उत्तम ...

आली. नवीन शिक्षण धोरणावर प्रा विलास खोपकर व प्राचार्या मुग्धा लेले या तज्ञांचे सखोल व प्रेरक मार्गदर्शन झाले. विद्यार्थ्यांसाठी क्षमताधिष्ठित कौशल्य विकसित करण्याचा रोड मॅप प्रशिक्षणात प्रा. प्रज्ञाकिरण वाघमारे, प्रा महेश पाटील, भक्ती राऊत मॅडम, संजय चौधरी सर यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना दिला. शाळेचे मुल्यांकन प्रणाली SQAAF व समग्र प्रगती पुस्तक यावर प्रभावी भाष्य कॅरल रॅाड्रीक्स मॅडम, चंद्रकांत वीरकर सर, संघवी ठाकूर मॅडम यांनी केले. वसई तालुका शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणात समन्वयिका प्रिती राठोड मॅडम यांनी उत्तम व्यवस्थापन पाहिले व डॅा. प्रा. महादेव इरकर यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमात प्रश्न निर्मिती व 'काऊट' हे विशेष आकर्षण ठरले.

## जागतिक महिला दिनानिमित्त पालघर ...

पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच सुसज्ज – आपल्या कार्यक्षेत्रात नियोजनबद्ध पद्धतीने काम करणाऱ्या महिलांचा सन्मानसुव्यवस्थित – स्वच्छता आणि व्यवस्थापन कौशल्य असणाऱ्या महिलांना गौरव करण्यात आला. सुसंस्कृत – उत्तम संवाद आणि आदर्श वर्तनासाठीत्वरीत सेवा – तातडीने आणि प्रभावी सेवा देणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्यात आले. समयनिष्ठ – वेळेचे उत्तम नियोजन करणाऱ्या महिलांसाठी, उत्साही –आपल्या कार्यात सातत्य आणि ऊर्जेने काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. संवेदनशील – लोकहिताची जाण ठेवून सेवा देणाऱ्या महिलांना गौरवगुणवत्ता जपणाऱ्या –आपल्या कार्यात सातत्याने गुणवत्ता राखणाऱ्या महिलांसाठी तर सहयोगी – सहकार्यभावना जपणाऱ्या महिलांचा विशेष सत्कारअशा प्रकारचे पुरस्कार देऊन आरोग्य विभागातील विभागातील महिलांचा सत्कार करण्यात आला. एकूण ९० महिलांना या विशेष गुणांवर आधारित पुरस्कार प्रदान करण्यात आले. महिला व बालविकास विभाग व आरोग्य विभागाच्या संयुक्त प्रयत्नांतून कुपोषण निर्मूलन कार्यक्रम राबवण्यात आला, ज्यांतर्गत पोषण स्थितीत सुधारणा करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता प्रदान करण्यात आला. सॅम (Severe Acute Malnutrition - SAM) ते मॅम (Moderate Acute Malnutrition - MAM) श्रेणीत सुधारणा – ५०० प्रति बालक, मॅम (MAM) ते सामान्य (Normal) श्रेणीत सुधारणा – ५०० प्रति बालक, सॅम (SAM) ते थेट सामान्य (Normal) श्रेणीत सुधारणा – १,००० प्रति बालक, याप्रमाणे भत्ता देण्यात आला. यंदा ९३४ बालकांचे पोषण सुधारले असून, संबंधित अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता डीबीटीद्वारे त्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी महिलांच्या आरोग्य व पोषण सुधारणा कार्यात अधिक गती देण्यासाठी आरोग्य विभाग आणि आयसीडीएस विभागाने समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले. या सोहळ्याच्या माध्यमातून महिलांच्या कार्यक्षमतेला मान्यता मिळाली असून, त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्या ...

तलावा जवळ दबा धरुन बसलेल्या पोलीसांना त्या वाहनाची माहीती दिली. मंगळवारी सायंकाळी ५:४५ वाजेच्या सुमारांस खोडाळा बाजुकडुन आलेली मारुती सुझुकी कंपनीची आल्टो मॉडेलची मोटार कार क्रमांक M.H.15-BD-7280 हिला हारोसाळे तलावा जवळ पोलीसांनी हात दाखवुन कार थांबविण्यास सांगीतली. मोटार कार चालकाने रोडच्या किनारी कार थांबवीली. त्यावेळी त्या मोटार कारमध्ये दोन इसम बसलेले होते. त्या दोन्ही इसमांना कारच्या खाली उतरवुन पंचां समक्ष त्यांची नावे विचारली असता फारुक नजीर शेख, (५३) वर्ष, रा. व अविनाश दिलीप राजभोज, (२७) दोघे राहणार अस्वली स्टेशन, ता. इगतपुरी, असे सांगितले. त्यांना ताब्यात घेतले व त्या मोटार कारची पंचासमक्ष तपासणी केली असता कारच्या ड्रायव्हरच्या सिटच्या मागील बाजुस एक काळया-पिवळसर रंगाची पिशवीमध्ये एक पिवळसर रंगाची पिशवी, एक पांढऱ्या रंगाची पिवशी व खाकी रंगाच्या प्लास्टीकच्या चिकटपट्टीने पॅक केलेले २ बॉक्स मिळुन आले. कारमध्ये मिळुन आलेल्या मालाबाबत ताब्यात घेतलेले इसमांकडे चौकशी केली असता त्या पीशवीमध्ये गांजा असल्याचे सांगीतले. सदरच्या पिशव्या व चिकटपट्टीने चिकटवलेले बॉक्स खोलुन पाहीले त्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ असल्याची खात्री झाली. त्यांच्या ताब्यात मिळुन आलेल्या गांजाचे वजन केले असता ते ५ किलो ७५ ग्रॅम एवढे झाले. नमुद इसमांकडुन गांजा, मोटार कार व मोबाईल असा अंदाजे ३ लाख ३५ हजार ७५ रुपयांचा माल हस्तगत केला आहे. ताब्यात घेतलेले इसम फारुक नजीर शेख, अविनाश दिलीप राजभोज यांना, त्यांच्या ताब्यात मिळुन आलेला गांजा हा अंमली पदार्थ व मोटार कार ही जप्त केली आहे. त्याबाबत वाडा पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ बाळगल्या बद्दल गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही आरोपींना शनिवार पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदरची कारवाई बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, गणपत पिंगळे, उपविभागीय अधिकारी जव्हार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे, उपनिरीक्षक सागर मालकर, सुमेध मेढे, हवालदार गुरुनाथ गोतारणे, शिपाई गजानन जाधव, चेतन सोनावणे, संतोष वाकचौरे यांनी केली. केली आहे. गुन्हयाचा अधिक तपास उपनिरिक्षक सुमेध मेढे करत आहेत.

## हजारो महिलांच्या उपस्थितीत बक्षिसांची...

आहे त्यामध्ये शूर महिलांचा सुद्धा मोठा सहभाग आहे. माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, क्रांतिज्योती सावित्री फुले, डॉ आनंदी जोशी, लता मंगेशकर या महिला महाराष्ट्राच्या मातीत जन्माला येऊन त्यांनी देशाला दिशा देण्याचे काम केले आहे.या देशात जन्माला आलेल्या मंथरा ही महिला होती जिजाऊ ही महिला होती मंथरा मुळे रामायण घडलं जिजाऊ मुळे शिवबा नव्हे तर तुमचा आमचा महाराष्ट्र घडला आणि म्हणून मंथरा व्हायचं की जिजाऊ व्हायचं ते महिलांनी ठरवलं पाहिजे असे प्रतिपादन कपिल पाटील यांनी करीत महिलाना स्वावलंबी होण्याच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी उपस्थित महिलांना दिलेल्या लक्की कूपन मधून पाच यशस्वी कूपन धारक महिलांना ऍक्टिव्हा स्कूटर, फ्रिज, वॉशिंग मशीन, कूलर, एलईडी टिव्ही कपिल पाटील यांच्या शुभहस्ते भेट देण्यात आले. तर आयोजकांच्या वतीने कपिल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त केप कापून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कपिल पाटील फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## 'वसई तालुका पत्रकार संघ' व 'यंग...

चांगानी, डॉ. सीमा महाजन, डॉ.शरयू सामंत,डॉ.गौरी अलोझ, डॉ. सिल्विया कोलको, डॉ. मानवीन पाटील, डॉ.रेणुका पाटील आणि डॉ. कविता बिरूड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.शरयू सामंत यांनी केले. हा कर्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे खजिनदार अरुण सिंग, शिवकुमार शुक्ला, विवेक पाटकर, विल्ह्यम डिसिल्व्हा, नितांत राऊत, राजू सोनी, किरण कीर्तने यांनी मेहनत घेतली.

## वसई तहसीलदार कार्यालयाच्या टेरेसवर...

शेती वाडीच्या मोठं क्षेत्र असलेल्या जागेवर कौटुंबिक गरजे करता होणारी लागवड व त्याची प्राणी, पक्षी यांपासुन रक्षण करणे अवघड असते. त्याची देखरेख करणेही कठीण होते. अश्यावेळी टेरेस गार्डन संकल्पना फायदेशीर ठरते. ही संकल्पना उपयुक्त ठरण्याबरोबरच कशी यशस्वी ठरू शकते त्याचे वसई तहसीलदार कार्यालय हे उदाहरण ठरले आहे.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी वाड्यात...

निर्माण झाली आहे. या पार्श्वभुमीवर, वाडा तालुक्यातील बौद्ध समाज बांधवानी न्याय मिळावा यासाठी वाड्याचे तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनाकडे विंनती करणारे निवेदन दिले.

महाराष्ट्र प्रशासनाच्या वतीने शिफारस करून बिहार सरकारला विनंती करावी, की बोधगया मंदिर अधिनियम १९४९ रद्द करावा आणि महाबोधी महाविहारांचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध समाजाला बहाल करावे. अशी विनंती यावेळी करण्यात आली. खंडेश्वरी नाका येथून निघालेल्या रॅलीत समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर तहसील कार्यालय समोर बौद्ध बांधवानी आपले मनोगत व्यक्त केले.

क्राईम संध्या | सोमवार दि. १७ मार्च २०२५ ते रविवार दि. २३ मार्च २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# विरारमध्ये शिक्षिकेच्या घराला आग
# १२वीच्या उत्तरपत्रिका जळून खाक



**विरार/प्रतिनिधी**

एका शिक्षिकेच्या घरात बारावीच्या विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेला आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याने पालक आणि विद्यार्थी चिंताग्रस्त आहेत. या घटनेचा अधिक तपास विरार पोलिस करत आहेत. बोर्डाच्या परिक्षांच्या उत्तर पत्रिकांबाबत अशाप्रकारचा हलगर्जीपणा वाढत असल्याचे दिसून येत आहे. नुकत्याच पार पडलेल्या १२वीच्या परिक्षेच्या चिंतेतून विद्यार्थी मुक्त झाले असतानाच, विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे टेन्शन वाढवणारी एक घटना विरार येथे घडली आहे. १२वी कॉमर्सच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी घरी घेऊन आलेल्या शिक्षिकेच्या घरात उत्तर पत्रिकांना आग लागली. विरार पश्चिम येथील गंगुबाई अपार्टमेंट, नानभाट रोड, बोळींज, आगाशी परिसरात राहणाऱ्या शिक्षिकेच्या घरी ही घटना घडली आहे. या शिक्षिकेने १२वी कॉमर्सचे पेपर रीचेकिंगसाठी घरी आणले होते. या पेपरचा गठ्ठा त्यांनी सोफ्यावर ठेवला होता. काही वेळाकरिता शिक्षिकेच्या घरातील लोक बाहेर गेले. शिक्षिकेचं घर बंद असताना अचानक शॉर्टसर्किट झाला आणि आग लागली. त्यामध्ये घरातील इतर सामानासहित विद्यार्थ्यांच्या बारावी कॉमर्सच्या उत्तरपत्रिकाही जळून खाक झाल्या. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होताच विद्यार्थी आणि पालकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. संतप्त पालकांनी असे पेपर घरी आणता येतात का? असा सवाल उपस्थित केला आहे. विद्यार्थ्यांसहीत त्यांच्या पालकांनी वर्षभर मेहनत घेतली होती. आधिच १२वी बोर्डाच्या परिक्षेमुळे विद्यार्थी आणि पालक टेन्शनमध्ये असतात.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याची चिंता वाढली आहे. ही शिक्षिका कोणत्या शाळेची आहे? यात कुणाचा निष्काळजीपणा आहे? पेपर जाळले की जळाले? याचा बोळींज पोलीस तपास करत आहेत. या घटनेत ज्यांचा निष्काळजीपणा असेल त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार असल्याचे बोळींजचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत यांनी सांगितले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी जाऊन आगीवर नियंत्रण मिळवले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी बारावीच्या विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीवर लागले आहे.

# ठाण्यात 'एक गाव, एक होळी' उत्साहात साजरी

**● पारंपारिक वेशभुषेत कोळीबांधवांचा सहभाग ● ८४ वर्षांपूर्वी हा उत्सव काही कारणास्तव बंद झाला होता**

**ठाणे/प्रतिनिधी**



शहरातील चेंदणी कोळीवाडा येथे होळीच्या पूर्वसंध्येला साजरी होणारी 'एक गाव एक होळी' ही चळवळ गावकीच्या एकजुटीची प्रतीक मानली जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही चेंदणी कोळीवाडा कोळी जमात ट्रस्ट, ठाणे यांच्या वतीने होळीच्या पूर्वसंध्येला 'एक गाव एक होळी'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व आगरी कोळी बांधव, महिला पारंपारिक वस्त्रे परिधान करुन एकत्र येत मोठ्या उत्साहात होळी साजरी केली. यावेळी कोळीगीते आणि कोळी बॅण्डवर सर्व कोळी बांधव ताल धरला. फाल्गुन महिन्यात येणारा होळीचा सण उत्साह आणि जल्लोषाची पर्वणी असते. महाराष्ट्रात विशेषतः कोकणात 'शिमगा' म्हणजेच 'होळी' हा सण साजरा करण्याची पारंपारिक प्रथा वर्षांनुवर्षांपासून चालत आली आहे. त्याचप्रमाणे, ठाण्यातील चेंदनी कोळीवाडा येथे 'एक गाव एक होळी' ही प्रथा अनेक वर्षापासून जोपासली जात आहे. 'एक गाव एक होळी' ही पद्धत खरंतर फार पूर्वीपासूनची होती. परंतू, ८४ वर्षांपूर्वी हा उत्सव काही कारणास्तव बंद झाला होता. २०१५ साली कोळी जमात ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकात नाखवा होते. त्यावेळी त्यांनी पुढाकार घेऊन या उत्सवाला पुन्हा नव्याने सुरुवात केली. त्यानुसार, यंदा या 'एक गाव एक होळी' चे हे ११ वे वर्षे असल्याची माहिती या गावातील डॉ. गिरीश साळगांवकर यांनी दिली. या उत्सावात गावातील नविन जोडपी पारंपारिक वेशभुषेत सहभागी होतात. नविन जोडप्यांच्या हस्ते होळीची पूजा करण्याची परंपरा गेले वर्षानुवर्ष या गावात सुरु आहे. तसेच गावातील आबालवृद्ध, महिला, तरुण यांचाही उत्स्फूर्त सहभाग यावेळी पाहायला मिळतो. तर,ठाणे शहरातील चेंदणी कोळीवाड्यासह कोपरी गाव, हजुरी गावठाण आणि महागिरी कोळीवाडा येथेही गेले अनेक वर्षांपासून एक गाव, एक होळी मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यावर्षी विविध गावांमध्ये होळी उत्सवाच्या निमित्ताने अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः तरुणांसाठी होळी क्रिकेट चषक स्पर्धांचे आयोजन झाले असून विजेत्यांना बोकड, कोंबडी आणि अंडी असे पारंपरिक बक्षीसे देण्यात आली. यामुळे या स्पर्धांना उत्तम प्रतिसाद मिळाला. 'आमच्या दाराशी हाय शिमगा, सण शिमग्याचा आयलाय रे आमचे गावा' अशा होळीशी निगडिच विविध गाण्यांच्या तालावर कोळी बांधवांनी एकत्रित येत नृत्य सादर केले. वर्षांनुवर्षांपासून सुरु असलेला 'एक गाव एक होळी' चा उत्सव पाहण्यासाठी शहराच्या विविध भागातील नागरिक याठिकाणी येतात. यंदाही हा उत्सव पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

# डंपरद्वारे डेब्रिज वाहतुकीमुळे अपघाताची शक्यता

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**




मिरा- भाईंदर शहरात आणि राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात डंपरद्वारे धोकादायक डेब्रिज वाहतूक केली जात आहे. डंपरमध्ये प्रमाणापेक्षा जास्त माती, दगड, डेब्रिज भरून रस्त्याने वाहतूक केली जात आहे. डंपरमधून दगड खाली पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे महापालिका आणि पोलीस दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. मिरा-भाईंदर शहरात सीआरझेड, खाडी क्षेत्रात रस्त्याच्या बाजूला अवैधरित्या माती भराव केला जात आहे. मिरारोड पश्चिमेला तर दररोज हजारो गाड्या अवैध रित्या डेब्रिज टाकून भराव केला जात आहे. मुंबईतून डंपर वाहतूक करून दहिसर चेकनाक्यावरून मिरा- भाईंदर व वरसावे, घोडबंदर या परिसरात खाली केले जात आहेत. तसेच राष्ट्रीय महामार्गावरून पुढे गाड्या पूर्ण भरुन धोकादायकरित्या दगड, माती वाहतूक केली जात आहे. ओव्हरलोडेड डंपरमुळे वाहन चालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या डंपरमधून माती, खडी रस्त्यावर पडून अपघात घडत आहेत. तसेच माती हवेत उडून प्रदुषण वाढत आहे. याकडे महापालिका आणि पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत आहे, अशा तक्रारी आहेत. भाईंदर पश्चिमेला आणि राष्ट्रीय महामार्गावर मातीच्या ढिगार्याने भरलेला डंपर आणि त्याच्या वर एक मोठा दगड धोकादायकपणे लटकलेला दिसून आला. डंपरजवळ गाडी चालवताना मागून येणार्या कार चालकाच्या गाडीवर दगड पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असुरक्षित भारांमुळे उडणारे कचर्याचे ढिगारे अनेकदा वाहनचालक आणि पादचार्यांसाठी जीवघेणे ठरत आहेत. याविषयी अनेक तक्रारी केल्या तरी त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

# 'आरंभ २०२५' क्रीडा संमेलनाचे डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी**



येथील माईर एमआयटी शिक्षण संकुल येथे एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजित 'आरंभ क्रीडा संमेलन २०२५' चे उद्घाटन कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. धावणे, गोळाफेक व रिले स्पर्धेने क्रिडा संमेलनाचा शुभारंभ करण्यात आली. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, मुख शल्य तज्ञ डॉ. अमोल डोईफोडे, क्रिडा स्पर्धा संयोजक डॉ. वर्षा सांगळे, क्रीडा समिती प्रमुख डॉ. सुजित झाडके, डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी, क्रिडा शिक्षक बालाजी शेप, सोनाली माळी हे उपस्थित होते. यावेळी १०० मीटर धावणे स्पेर्धेचा शुभारंभ कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या उपस्थितीत करण्यात आला. १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत मुलांच्या गटात रुशील पाटलेने प्रथम क्रमांक पटकावला, तर रोहन राठोड दुसऱ्या स्थानी आणि गजानन वाघमोडे तिसऱ्या स्थानी राहिला. मुलींच्या गटात विष्णुप्रिया आपसिंगकर याने सर्वांना मागे टाकत प्रथम स्थान मिळवले, अंजली राठोड ने दुसरे स्थान, तर स्नेहा अंबुलगे हिने तिसरे स्थान पटकावले. त्याचबरोबर २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत मुलांच्या गटात गजानन वाघमोडे पहिल्या स्थानावर राहिला, रुशील पाटलेने दुसरे, तर जय करंजे ने तिसरे स्थान मिळवले. मुलींच्या गटात जयंती पांढरेने पहिले स्थान पटकावले, स्नेहल कोकाटे दुसऱ्या तर स्नेहा अंबुलगे तिसऱ्या स्थानी राहिली. तसेच रिले स्पर्धांमध्येही चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. ४०० मीटर रिले स्पर्धेत मुलांच्या गटात टीम श्रेष्ठाने विजेतेपद मिळवले. या संघात सचिन बेल्लाळे, डॉ. आदित्य रेड्डी, रोहित ऐतवडे आणि डॉ. गजानन वाघमोडे यांनी उत्कृष्ट धाव घेतली. टीम रौद्र ने दुसरा क्रमांक, तर टीम शौर्यने तिसरा क्रमांक मिळवला. मुलींच्या गटात ४०० मीटर रिलेमध्ये टीम शौर्यने प्रथम क्रमांक पटकावला. उत्कर्ष वाणी, प्रीती सिंग, अंजली राठोड आणि पुजा कुमदले यांनी आपल्या संघासाठी विजेतेपद मिळवले. टीम श्रेष्ठाने दुसरे स्थान, तर टीम रौद्र ने तिसरे स्थान मिळवले. त्यानंतर घेण्यात आलेल्या गोळाफेक स्पर्धेत ही दमदार कामगिरी पाहायला मिळाली. मुलांच्या गटात रोहन राठोडने ९.९२ मीटर अंतर फेक करुन पहिले स्थान पटकावले. स्नेह जाजु दुसऱ्या क्रमांकावर, तर प्रशांत घुले तिसऱ्या क्रमांकावर राहिला. मुलींच्या गटात प्रीती सिंगने ५.१ मीटर अंतर फेक करत पहिले स्थान मिळवले, आदिती पाठक दुसऱ्या स्थानी, तर प्रणाली भिसे तिसऱ्या स्थानी राहिली. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर मनपा शाळेस मनपा उपायुक्त खानसोळे यांची भेट



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी शनिवारी (दि. ८)महात्मा बसवेश्र्वर विद्यालय, मनपा शाळा क्रमांक ०६, बसवेश्वर चौक येथे अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली. शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी आवश्यक त्या सुविधा व प्रयत्नांचा आढावा घेण्यासह शाळेच्या अडचणी जाणून घेण्यासाठी त्यांनी ही भेट दिली. भेटीदरम्यान ४७ विद्यार्थी पटसंख्या असलेल्या या शाळेमध्ये मुख्याध्यापक महेश तोडकर आणि सहशिक्षक सतिश चव्हाण हे विद्यार्थ्यांना शिकवताना आढळले. विशेष म्हणजे शाळेतील संपूर्ण अध्यापन प्रक्रिया डिजिटल आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय असून शालेय परिसर स्वच्छ व सुसज्ज असल्याचे पाहून उपायुक्त खानसोळे यांनी समाधान व्यक्त केले. शाळेतील भौतिक सुविधा अधिक कशा वाढवता येतील याबाबत त्यांनी शिक्षकांसोबत चर्चा केली. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारासंदर्भात माहिती विचारली. दररोज दिल्या जाणाऱ्या मेनूबाबत चौकशी करून शालेय पोषण आहार अधिक चविष्ट व पौष्टिक कसा देता येईल ? याबाबत मार्गदर्शन केले. उपायुक्त खानसोळे यांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधला. त्यांनी मराठीत वाक्य बोलून दाखवली असता विद्यार्थ्यांनी ती तत्परतेने इंग्रजीत अनुवादित करून सादर केली. खासगी इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांनाही लाजवेल अशी इंग्रजी भाषेची प्रगती या शाळेत पाहून समाधान वाटते, असे मत उपायुक्तांनी व्यक्त केले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण शाळेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी पुरवलेल्या डिजिटल संचाचा या शाळेत योग्य व परिणामकारक वापर होत असल्याचेही निदर्शनास आले. डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महानगरपालिकेच्या शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नांचे फलितही दिसू लागले असून महानगरपालिका शाळांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण गुणात्मक बदल होत असल्याचे निदर्शनास येत आहे. कार्यक्रमादरम्यान शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेत मिळवलेले पुरस्कार उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. उपायुक्तांनी सर्व शिक्षकांना शाळेची अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा कशी साध्य करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. शाळा विकासातील अडचणी दूर करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील, असे आश्र्वासनही त्यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन करून त्यांनी उपस्थित शिक्षकाना प्रोत्साहित केले. या भेटीत उपायुक्त खानसोळे यांच्या सोबत मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती तसेच लिपिक पाटील हेही उपस्थित होते.

# लग्नात चोरी करणाऱ्या 'कडिया सासी' टोळीला मध्यप्रदेशातून अटक

**विरार/प्रतिनिधी**





लग्नात शिरून लहान मुलांच्या मदतीने दागिने आणि रोख रक्कम लंपास करणार्या मध्यप्रदेशातील कुप्रसिध्द 'कडीया सासी' टोळीतील एकाला अटक करण्यात बोळींज पोलिसांना यश आले आहे. या टोळीला पकडण्यासाठी गेलेल्या बोळींज पोलिसांच्या पथकाला गावातील ग्रामस्थांनी प्रतिकार करत ११ दिवस झुंजवत ठेवले होते. विरार मध्ये राहणाऱ्या मिनल पाटील यांच्या मुलीचे २० फेब्रुवारी रोजी लग्न होते. रात्री १० च्या सुमारास लग्नात आहेर म्हणून आलेले ८ लाख रुपये आणि ३ तोळे सोन्याचे दागिने असलेली बॅग गायब झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणाचा बोळींज पोलिसांनी तपास केला असता एक लहान मुलगा बॅग नेत असल्याचे दिसून आले. पुढील तपासात लग्न सोहळ्यात चोरी करण्यासाठी कुप्रसिध्द असलेली मध्य प्रदेशातील कडिया सासी टोळी यामागे असल्याचे निष्पन्न झाले. बोळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक या टोळीतील चोरांना शोधण्यासाठी मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील कडिया, गुलखेडी, हुलखेडी या गावात गेले. संपूर्ण गावातील ग्रामस्थच अशा चोरीच सक्रीय असल्याचे आढळले. ग्रामस्थांनी पोलिसंना गावाच शिरू न देता जोरदार विरोध केला आणि आरोपींना लपवून ठेवले होते. त्यामुळे या टोळीतील आरोपींना पकडता येत नव्हते.

दरम्यान, अन्य गुन्ह्याच्या तपासासाठी आलेल्या उत्तर प्रदेशातील पोलिसांच्या पथकावरही ग्रामस्थांनी हल्ला केला होता. बोळींज पोलिसांनी मग राजगड जिल्ह्यातील बोडा पोलिसांच्या मदतीने गावात प्रवेश केला आणि टोळीतील विकासकुमार सिसोदिया (सासी) (३३) याला अटक केली. मात्र या गदारोळात अन्य ४ आरोपी पळून जाण्यात यशस्वी ठरले. विशेष म्हणजे लुटीतील ८ लाख रोख रकमेपैकी ९ लाख ९० हजार रुपये हस्तगत करण्यात यश आले. या टोळीत ५ जणांचा समावेश होता. १७ फेब्रुवारी रोजी ते वसईत आले आणि एका लॉज मध्ये मुक्काम केला. त्यानंतर शहरातील लग्नसोहळ्याची रेकी केली. एका लहान मुलाच्या मदतीने विरार मधील लग्नसोळ्यातील बॅग लंपास केली होती अशी माहिती परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली. सहाय्यक पोलीस आयुक्त विजय लगारे, बोळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे, पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक किरण वंजारी, विष्णू वाघमोडे आदींच्या पथकाने ही कारवाई केली. सध्या लग्नसराईचा मोसम सुरू आहे. अशा वेळी चोरांच्या टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. त्यामुळे लग्नस्थळी वावरणारे संशयितांवर लक्ष ठेवणे, आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी केले आहे.

# खराटतारा येथे ट्रक नदी पात्रात कोसळला, चालकाचा जागीच मृत्यू

**वसई/प्रतिनिधी**

मुंबई-दिल्ली राष्ट्रीय महामार्गावरील खानिवडे, खराटतारा येथे झालेल्या भीषण अपघातात कंटेनर वाहू मोठा ट्रक कठड्याचा वरचा भाग तोडून थेट नदी पात्रात कोसळला. तानसा नदी पात्राच्या दोन पुलांमध्ये सुमारे २५ ते ३० फूट खोल खाली कोसळलेल्या ट्रकची केबीन पात्रातील चिखलात रुतली. तर उर्वरित ट्रकचे अनेक भाग चेंदामेंदा झाले. रविवारी रात्री साडेआठ ते नऊच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. या अपघातात चालक ठार झाला असून त्याचा सहाय्यक गंभीर जखमी झाल्याचे समजले आहे. कंटेनरसारखी अवजड वाहतूक करणारा ट्रक हा मुंबईकडून गुजरातच्या दिशेकडे भरधाव वेगाने जात होता. याचदरम्यान तानसा नदीच्या पात्रावर असलेल्या सेवा रस्ता आणि मुख्य रस्ता अशा दोन पुलांच्या जवळ रविवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान आला असताना वाहनावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि दोन पुलांच्या मधल्या दरीत ट्रक कोसळला. अपघाताचा झालेला आवाज ऐकून गावातील ग्रामस्थांनी अपघातस्थळी धाव घेतली. मात्र भर नदी पात्रातील पुलांखाली असलेल्या अंधारात त्यांना मदत करण्यास अडथळे येत होते. दरम्यान घटनेची मिळताच पोहचलेल्या मांडवी पोलिसांनी तात्काळ मदत कार्य सुरू केले. खाडीला आलेल्या भरतीमुळे मदत कार्यात मोठा अडसर निर्माण झाला असता. तर जेथे अपघात घडला ती जागा अपघाती असून येथून जाणार्या वाहन चालकांना दोन रस्त्यांच्या मध्ये रात्री संभ्रम निर्माण होत असावा, म्हणून इथेच जास्त अपघात घडतात. यामुळे येथे कायम स्वरूपी योग्य उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे स्थानिक मदत करणार्या रहिवाशांनी सांगितले.

**महाआदीशक्ति चॅरिटेबल ट्रस्ट व आपला श्री चिंतामणी उत्सव मंडळ यांचा उपक्रम**

# उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्काराने सन्मान

**विरार/प्रतिनिधी**




महाआदीशक्ति चॅरिटेबल ट्रस्ट आणि आपला श्री चिंतामणी उत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या संचालिका सावित्री कलांगण यांच्या पुढाकाराने प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत विरार पूर्वेला नारंगी बायपास रोड येथे महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ ठेवण्यात आला होता. यावेळी विविध क्षेत्रात आपल्या कामगिरीच्या जोरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना महाआदीशक्ति चॅरिटेबल ट्रस्ट आणि आपला श्री चिंतामणी उत्सव मंडळ यांच्या वतीने नारीशक्ती महाआदीशक्ति पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले. यामध्ये सामाजिक व राजकीय नेतृत्व व महिलांसाठी सहकार्य करणाऱ्या वसई विरार महापालिकेच्या मा. नगरसेविका सिमा काळे, सामाजिक कार्यात घर सांभाळुन घेऊन चार्टर्ड अकाऊंटंट ही पदवी मिळवलेल्या सौ. सुप्रिया दवंडे, विद्यार्थी यांना चांगले मार्गदर्शन करणारे व ज्ञान देणाऱ्या सौ. विद्या गिरधर ह्या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या. यावेळी संस्थेच्या संस्थापक तथा खजिनदार व मार्गदर्शक सावित्री संजीव कलांगण, कार्यक्रमाचे आयोजक संस्थेचे अध्यक्ष गौरव संजीव कलांगण, सचिव राजेश परब, उपसचिव स्वप्निल नेवाळकर, कार्याध्यक्ष वैभव खेडेकर तसेच संस्थेचे सभासद प्रियंका शिरिषकर, सुप्रिया नाईक, योगिता धनावडे, रेणुका तरळ, संगिता बावकर, संगिता मकवाना, पुनम दुतकर आदि पदाधिकारी उपस्थित होते.

17 TO 23 MARCH 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 3/15/2025 8:29 PM Page 1



# प्रिंट मिडीयाला मरण नाही -आ.अभिमन्यु पवार




**लातूर/प्रतिनिधी**

मी गतवर्षीच मुक्तेश्वरांच्या साक्षीने राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे पालकत्व स्विकारले आहे. म्हणून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या नेतृत्वात सार्वजनिक ग्रंथालयांना चाळीस टक्के अनुदान वाढ, दर्जा बदल आणि नवीन ग्रंथालय मान्यता मिळण्याच्या दृष्टिने दोन बैठका लावल्या आहेत असे सांगून, आज सोशल मिडीया कितीही प्रभावी दिसत असला तरी प्रिंट मिडीयाला मरण नाही, पुस्तक म्हणजे विचार आहेत, ते जतन करण्याचे, घराघराघरात पोहाचेविण्याचे मोलाचे काम सार्वजनिक ग्रंथालये करत आहेत, त्यात काम करणारे ग्रंथालय कर्मचार्यांच्या वेतनश्रेणीचा मार्गी लावून घेण्यासाठी आपण सदैव कटिबध्द असल्याची ग्वाही आ.अभिमन्यु पवार यांनी येथे दिली. लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि नागाबुवा वाचनालय, हेळंब यांच्या संयुक्त विद्यमाने, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन गुरुवार, दि.१३ मार्च २०२५ रोजी कातळे नगरातील नंदादिप माध्यमिक विद्यालयात पार पडले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून आ.पवार बोलत होते. या सत्राच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ.गजानन कोटेवार हे हे होते. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव धुमाळ हे विशेष अतिथी होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे, मराठवाडा विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख, राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ.रामेश्वर पवार, राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे, बीड जिल्हाध्यक्ष सुधीर चाटे, लातूर जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, हेळंबच्या सरपंच अयोध्या सिरसे, नागाबुवा मठाचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील, पाखरसांगवीचे सरपंच भिमाशंकर लखादिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतान आ.अभिमन्यु पवार म्हणाले की, गाव तिथे ग्रंथालय ही शासनाची भूमिका आहे, ती माझीही आहे, सध्या शासनाची आर्थिक स्थिती बेताची असली तरी सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रश्नांसदर्भात शासन सकारात्मक आहे. ग्रंथालय संघाचे राज्याध्यक्ष डॉ.कोटेवार यांची ग्रंथालयाच्या प्रश्नांप्रतीची भूमिका, तळमळीची व रास्त आहे. महापुरुषांनाही संघर्ष केलाच, वाचन केल्याशिवाय ज्ञान मिळणार नाही, म्हणून एमपीएस्सीचीही परीक्षा पध्दतीही डिस्क्रीप्टीव्ह करण्यात आली. त्यामुळे अभ्यासू अधिकारी मिळतील. ...पान ६ वर

# नविन शैक्षणिक धोरणातुन उत्तम शिक्षण आणि योग्य प्रशिक्षणाने राष्ट्र विकासाला गती मिळेल!

## विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक लालू तुरे यांचे प्रतिपादन



**विरार/प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी आयोजित शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.० या पाच दिवसीय शिबिराचा समारोप शनिवार ८ मार्च रोजी यश विद्या निकेतन स्कूल, विरार (पूर्व) येथे संपन्न झाला. या प्रशिक्षणासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संभाजी भोजने, वसई पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सौं. माधुरी पाटोळे आणि यश विद्यानिकेतन शाळेच्या प्राचार्या सौ रुचिता ठाकूर मॅडम यांनी भेटी दरम्यान मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. लालू तुरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी उत्तम शिक्षण आणि योग्य प्रशिक्षणामुळे राष्ट्र विकासाला गती मिळते असे सांगत शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व स्पष्ट केले. प्रशिक्षक प्रा. स्वाती जयकर यांनी नवीन शिक्षण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांनी आधुनिक स्पर्धात्मक जगातील क्षमता आत्मसात करणे गरजेचे आहे व त्या क्षमता आपल्या विद्यार्थ्यांना गरूडझेप घेण्यास सक्षम करतील असे प्रतिपादन केले. यावेळी महिला दिनाचे औचित्य साधून महिला शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात सहभागी शिक्षकांना कार्यमुक्ती प्रमाणपत्रे प्रदान करण्यात ...पान ६ वर

# जागतिक महिला दिनानिमित्त पालघर जिल्हा परिषदेत महिला गौरव सोहळा

**पालघर/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पालघर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष महिला मेळावा आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. इको गोवर्धन विलेज, गलतरे वाडा येथे झालेल्या या कार्यक्रमात महिलांच्या कार्याचा गौरव करत त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे होते. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मराड, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश सुरडकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रवीण भावसार तसेच महिला व बालविकास विभागाचे अधिकारी आणि तालुका स्तरावरील विविध अधिकारी उपस्थित होते. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास



पालवे यांच्या पत्नी सुनीता पालवे, यांना तसेच इतर अधिकाऱ्यांच्या पत्नी यांना महिला दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मानया सोहळ्यात आरोग्य, पोषण आणि समाजहितासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. आरोग्य विभागाच्या वतीनेफ्लॉरेन्स नाईटएंगल पुरस्कार - सन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या १५ परिचारिकांना प्रदानआशा वर्कर्स विशेष सन्मान - सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन वर्षांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १० आशा वर्कर्सना पुरस्कारमहिला व बालविकास विभागाच्या वतीने आदर्श अंगणवाडी पुरस्कारामध्ये प्रथम क्रमांक ५,०००, द्वितीय क्रमांक ३,०००, तृतीय क्रमांक प्रमाणपत्र १२ पर्यवेक्षिका, ३६ अंगणवाडी सेविका आणि ३६ अंगणवाडी मदतनीस यांना विशेष सन्मानित करण्यात आले. महिलांमधील गुणवत्ता आणि योगदान ओळखण्यासाठी ९ विशेष गुणांवर आधारित ...पान ६ वर

# पालघर जिल्हा परिषदेत पाणी गुणवत्ता विषयक जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**पालघर/प्रतिनिधी**

राज्य पाणी व स्वच्छता मिशन तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत जिल्हास्तरीय एक दिवसीय कार्यशाळा दिनांक १२ मार्च रोजी जिल्हा परिषद, पालघर येथे आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा सभागृह येथे पार पडली. कार्यशाळेत जल जीवन मिशन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा, पाणी गुणवत्ता परीक्षण, शुद्धीकरण प्रक्रिया, आरोग्यदृष्ट्या सुरक्षित पाणीपुरवठा, तसेच प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यशाळेस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, प्रकल्प संचालिका रुपाली सातपुते, पाणी व स्वच्छतेचे प्रकल्प संचालक अतुल पारस्कर, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) राजेश पाध्ये यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जल जीवन




मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना १००% योजना मार्चअखेर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी या योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, असे सांगितले.सर्व संबंधित विभागांनी एकत्रित काम केल्यास जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाला देण्यात नलाद्वारे शुद्ध पाणी मिळेल. त्यामुळे जलजन्य रोग, मृत्यू दर आणि कुपोषण रोखण्यास मदत होईल. असे मत यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी व्यक्त केले.पाणी गुणवत्ता सुधारण्याच्या उपाययोजना व शुद्धीकरण प्रक्रिया, ऋद्घ चाचणी व नमुना संकलन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, थटचखड व खचखड यांच्यातील परस्पर संबंध व माहिती अद्ययावत करण्याचे महत्त्व, विभागीय समन्वय व प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकारी-कर्मचारी कार्यशाळा,जल जीवन मिशन योजनांची सद्यस्थिती आणि उद्दिष्टपूर्ती या विविध विषयांवर कार्यशाळेत चर्चा करण्यात करण्यात आली.

# अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्या दोघांना वाडा पोलिसांकडून अटक



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा पोलीस ठाण्याचे पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, खोडाळा-वाडा रोडवर एका कार मधुन अंमली पदार्थाची अवैधरित्या वाहतुक होणार आहे. अशी खात्रीशिर माहीती मिळाल्याने. पोलीसांनी दोन लायक पंचांना बोलावुन त्यांना मिळालेल्या बातमीची माहीती दिली. पोलीसांनी दोन पथके तयार करुन एक पथक व पंच असे वेष पालटुन वाडा-खोडाळा रोडवर हारोसाळे गावाच्या हद्दीतील तलावा जवळ सापळा रचुन दबा धरुन बसले. एक पोलीस पथक व बातमीदार असे हारोसाळे पेट्रोल पंप येथे साध्या वेषात एका खाजगी वाहनामध्ये बसुन मिळालेल्या बातमीतील वाहनावर पाळत ठेवुन थांबले. सदर कार पळुन जावु नये म्हणुन मलवाडा फाटा येथे एक मोटार ट्रेलर ऊभा करुन ठेवला. संशय असलेली कार हारोसाळे पेट्रोल पंप येथुन पुढे वाडा बाजुकडे जाताच बातमीदार यांनी त्या कारची माहीती सोबत असलेल्या पोलीसांना दिली. पोलीस पथक व बातमीदार असे त्या गाडीच्या मागे मागे खाजगी वाहनामधुन येत असतांना त्यांनी हारोसाळे ...पान ६ वर

# कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गीतांनी लातूरकरांची मने जिंकली




**लातूर/प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने लातूर येथील दयानंद सभागृहात १२ ते १४ मार्च दरम्यान सायंकाळी ५ ते रात्री ८ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या कृषि संस्कृती महोत्सवात लोकप्रिय गायक डॉ.अभिजित कोसंबी, प्रसेनजीत कोसंबी, गायिका प्रज्ञा अन्नम, प्रणाली कदम यांनी व त्यांच्या चमूने सादर केलेल्या कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक गवळण, जात्यावरच्या ओव्या, भक्तीगीते, पोवाडा, लावणी, अभंग अशी एकापेक्षा एक सरस गाणी सादर करीत लातूरकरांची मने जिंकली. यावेळी उपस्थित लातूरकरांनी देखील कलाकारांना भरभरून प्रतिसाद देत त्यांचा उत्साह वाढविला. कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक मंचावर कार्यक्रमाची सुरूवात गायिका प्रज्ञा अन्नम यांनी सादर केलेल्या गणेश वंदनाने झाली. 'माळ्याच्या मळ्यामध्ये पाटाचं पाणी जातं', 'ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे', 'जीवा शिवाची बैलजोड', दही दूध लोणी, कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी, दूरच्या रानात केळीच्या बनात, काळ्या मातीत मातीत तिफण चालते, अशा एकाहून एक सरस गाणी सादर करीत लातूरकरांना मंत्रमुग्ध केले. यासोबतच कोसंबी बंधूंनी सादर केलेल्या तानाजी चित्रपटातील पोवाड्यालाही उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून प्रतिसाद दिला. गायिका प्रज्ञा अन्नम, प्रणाली कदम यांनी सादर केलेल्या लावणीवर तरुणाई सोबत अबाल वृद्धांनिही आपले वय विसरून गाण्याच्या तालावर ठेका धरताना दिसले. यासोबतच लातूरच्या युवा कलाकांराणी सादर केलेल्या उजळून आल आभाळ रामाच्या पारी अन् गाव गाव जागवित आली वासुदेवाची स्वारी या गीतावर नृत्य सादर करीत ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले. यालाही उपस्थितांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. यासोबतच कवयित्री शैलजा कारंडे यांनी सादर केलेल्या आपल्या कवितेतून कृषी विषयक रचनेलाही प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. निवेदक सुशील मिस्त्री यांच्या प्रभावी सूत्रसंचालनाने या कार्यक्रमाची रंगत वाढविली. महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा या जोषपूर्ण महाराष्ट्र गीताने पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे ॲड. शैलेश गोजमगुंडे,निमंत्रक अनिल पुरी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, कवयित्री शैलजा कांरडे, प्रमोद जोशी, प्रा.अनिल माळी,समन्वयक बी.एम घोलप यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# हजारो महिलांच्या उपस्थितीत बक्षिसांची लयलूट करीत साजरा झाला 'होम मिनिस्टर'



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालयाच्या प्रांगणात माजी सभागृह नेता सुमित पाटील यांच्या वतीने कपिल पाटील फाउंडेशन व भारतीय जनता पार्टी भिवंडी शहर जिल्हा यांच्या सहकार्याने महिलांसाठी भव्य होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमात संपूर्ण शहरातील सुमारे तीन हजार महिलांनी सहभाग घेतला. या प्रसंगी महिलांकरीता विविध स्पर्धांचे आयोजन करून महिलांना रोख बक्षीस व पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले. अनेक महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेत आपला आनंद साजरा केला.तर प्रत्येक उपस्थित महिलांना साडी भेट देण्यात आली. याप्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांसह भाजपा शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, शिवसेना शहरप्रमुख सुभाष माने, राष्ट्रवादी कॉंग्रेस शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, भाजपा महिलाध्यक्षा सुनीता टावरे, ममता परमाणी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र ही शूरवीरांची भूमी ...पान ६ वर


# 'वसई तालुका पत्रकार संघ' व 'यंग स्टार ट्रस्ट'च्या माध्यमातून ११ कर्तृत्वान महिला डॉक्टरांचा सन्मान



**विरार/प्रतिनिधी**

विरार आणि नालासोपारा मधील ११ कर्तृत्वान डॉक्टर महिलांचा सन्मान काल संध्याकाळी वसई तालुका पत्रकार संघ आणि यंग स्टार ट्रस्ट च्या माध्यमातून करण्यात आला हा कर्यक्रम इंडियन मेडिकल असोशिएशन, विरार मेडिकल असोशिएशन आणि पालघर अकॅडेमि ऑफ पॅरेडिएट्रिकसी यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्योलनाने झाली यावेळी पत्रकार संघाचे सचिव यांनी प्रास्ताविक करताना वसई तालुका पत्रकार संघ करत असलेल्या वेगवेगळ्या कामाची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाला वसई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप पंडित, सचिव आशिष राणे, नीवरून माहिती उपसंचालक निरंजन राऊत, इंडियन मेडिकल असोशिएशनचे अध्यक्ष विनीत दंडवते, विरार मेडिकल असोशिएशनच्या अध्यक्षा डॉ.अर्चना जोशी, तसेच पालघर अकॅडेमि ऑफ पाइडियाट्रिकस च्या अध्यक्षा जयश्री देशपांडे, डॉ. हेमंत जोशी व इतर डॉक्टर उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ.ऐश्वर्या धोडपकर, डॉ.वर्षा दंडवते, डॉ. मैत्रेयी दंडवते, डॉ. दीपिका ...पान ६ वर

# वसई तहसीलदार कार्यालयाच्या टेरेसवर विविध भाज्यांची आणि फुलांची यशस्वी लागवड



**वसई/प्रतिनिधी**

कमीत कमी जागेमध्ये फुलझाडे, फळझाडे लावून टेरेस गार्डन ही संकल्पना सध्या मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होत आहे. अनेकांनी बाजारातील रासायनिक प्रक्रिया केलेली भाजी आहारात घेण्यापेक्षा घरच्या टेरेस गार्डनमधे शेती, लागवड करून भाजीचे उत्पन्न घेणे अनेक जण पसंत करतात. परंतु, ही संकल्पना आजपर्यंत आपण रहिवासी संकुलामध्ये राबवल्याचे पाहिले आहे. वसईत प्रथमच शासकीय कार्यालयाच्या टेरेसवर काही कर्मचाऱ्यांनी लवंगी मिरची, फ्लॉवर, कोबी, मुळे, टोमॅटो, वांगी या भाज्यांचे पीक घेतले जाते या सोबतच विविध रंगाची झेंडूची फुले यशस्वी लागवड केली आहेत. वसई तहसीलदार कार्यालयाच्या टेरेसवर ही शेती पिकवण्यात आली आहे. पावसाळ्यापूर्वी कमीत कमी जागेत अशी भाजीची पिके घेतली जातात. रासायनिक खतांचा वापर न करता पिकवण्यात आलेल्या या भाज्या येथील कर्मचाऱ्यांच्या आता पसंतीस पडत आहे. शेती बागायतीची माहिती असलेल्या व लागवडीची आवड असलेल्या वसईकरांच्या ही संकल्पना आता पसंतीस पडली आहे. ...पान ६ वर

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी वाड्यात भव्य रॅली




**वाडा/प्रतिनिधी**

बिहार राज्यातील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ भारतीय बौद्ध महासभा वाडा तालुका शाखा व वाडा तालुक्यातील बौद्ध समाजाच्या वतीने बुधवारी (दि.१२) वाडा येथील खंडेश्वरीनाका येथून तहसिल कार्यालयावर भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रासह संपुर्ण देशभरातील बौद्ध समाजाचे बिहार राज्यातील पवित्र बोधगया महाबोधी महाविहार हे आस्थेचे व श्रद्धेचे स्थान आहे; परंतु सध्या अस्तित्वात असलेला बोधगया मंदिर अधिनियम १९४९ हा कायदा भारतीय संविधानातील अनुच्छेद १३,२५ आणि २६ मध्ये दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्य व संस्थात्मक व्यवस्थापनेच्या मुलभूत अधिकारांचे सरळसरळ उल्लंघन करतो. महाबोधी महाविहार हे केवळ बौद्ध समाजाचे धार्मिक व ऐतिहासिक वारसास्थळच नसून, संपूर्ण जगभरातील बौद्धांचे श्रद्धास्थान आहे, असे असतांना बौद्ध समाजाला त्यांच्या स्वतःच्या धर्मस्थळांचे संपूर्ण व्यवस्थापन करण्याचा हक्क नाकारला जात आहे, ही बाब अत्यंत अन्यायकारक आहे, त्यामुळे संपुर्ण बौद्ध समाजामध्ये असंतोष व नाराजी ...पान ६ वर